cmyk

संपादकीय

लाभाच्या योजना : सत्ता आणण्याचे घातकी साधन...

महाराष्ट्रात लाडक्या बहिणींनी चमत्कार घडवला. जेमतेम १०० ते १२५ दिवसांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या महायुतीला मतदारांनी डबल इंजिनचे आमिष असूनही नाकारले होते, त्याच महायुतीला लाडक्या बहिणींनी केवळ चारच महिन्यांत अविश्वसनीय बहुमत प्रदान केले. झारखंडमध्येही हेमंत सोरेन सरकारने निवडणुकीच्या तोंडावरच 'मैय्या सन्मान' योजना सुरू केली. महिलांना दरमहा १ हजार रुपये देणाऱ्या या योजनेने सोरेन यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली झालेला तुरुंगवास हा त्यांच्यावर अन्याय होता असे मानावे लागेल. इतपत सोरेन यांच्यावर विश्वास ठेवत त्यांची सत्तावापसी केली. महायुतीने आता लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

कामासाठी मुले पाहिजेत

मोबईलच्या होलसेल दुकानात काम करण्यासाठी होतकरू मुले पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल.

सेल्समन : ०२ (जागा)
ऑफीस बॉय : ०१ (जागा)

संपर्क:: मो.९२२५१४१४४०

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२१९ रविवार, दि.०१ डिसेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

साखरेच्या दरात प्रतिक्विंटल २०० रुपयांची कपात

कारखानदारांसह शेतकऱ्यांना फटका

पुणे । प्रतिनिधी

यंदाचा गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर लगेच साखरेची मागणी घटल्यामुळे प्रतिक्विंटल साखरेच्या दरात २०० रुपये कमी झाले आहेत. मागच्या दोन आठवड्यांपासून ही घसरण होत आहे. त्यामुळे उसाला जाहीर झालेली एफआरपीची रक्कम आणि इतर खर्चाचा ताळमेळ लावणे कारखान्यांना जिकिरीचे होणार आहे. दरम्यान, काही कारखान्यांकडून खर्चाचा ताळमेळ न बसल्यास एकरकमी एफआरपी देणेही कठीण होणार आहे. यातून शेतकऱ्यांनाही फटका बसण्याची शक्यता आहे.

मागील दोन आठवड्यांपासून साखर दरात घसरण होत आहे. प्रतिक्विंटल २०० रुपयाने घट झाली आहे. दसरा आणि दिवाळी सणादरम्यान प्रतिक्विंटल ३ हजार ५०० ते ३ हजार ६०० रुपये असलेला दरा आता ३ हजार ३५० ते ३ हजार ४०० रुपयांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे कारखान्यांना ३ हजार ५०० ते ३ हजार ६०० रुपयांच्या दरातच उसाची एफआरपी आणि इतर खर्च भागवावा लागणार होता. यातही आता २०० रुपयांची घट झाल्याने अडचण निर्माण झाली

आहे. गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर तसेच थंडीच्या दिवसात साखरेची मागणी कमी होते. थंडीच्या दिवसात शीतपेय, आइस्क्रीमची मागणी कमी होते. तसेच आता कोणतेही सण उत्सव नसल्याने साखर विक्री कमी होत असल्याचा परिणामही साखर विक्रीवर झाला आहे.

अनेक कारखाने साखर विक्री कोट्यापेक्षा जास्त साखर विक्री करत असल्याचे निदर्शनास येऊ लागले आहे. साखर कारखान्यांसमोर अनेक अडचणी आहेत. यातच आता साखरेच्या कमी दराची मोठी अडचण उभी राहिली आहे. याचा परिणाम शेतकऱ्यांवर होणार असल्याचे दिसत आहे.

बीड : मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे हे उपस्थित होते.

महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंप?

राजकारणात काहीही घडू शकते, आ. संजय सिरसट यांचा सूचक इशारा!

नेमकं काय म्हणाले संजय सिरसाट?

शिंदे साहेबांना निवांत वेळ हवा असेल, त्यामुळे ते त्यांचे मुळे गाव दरे इथे जाऊन सगळा निर्णय घेतील आणि त्यांचा निर्णय सोमवारी आम्हाला सांगतील, असे शिरसाट यांनी म्हटले आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर झाल्याशिवाय कोणतं खातं कोणाकडे आहे, याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. प्रायमरी स्टेजवरती चर्चा झाली आहे. फायनल काही झाले नाही, जर मुख्यमंत्री भाजपचा झाला तर गृहखात आमच्याकडे असावे हा आमचा आग्रह आहे. उपमुख्यमंत्री व गृहखात याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी जाहीर करतील. तोपर्यंत वेट अँड वॉच सोमवारी शिंदे साहेब काय निर्णय घेतील हे कळेल. राजकारणात कधीही काहीही होऊ शकते. कुठलीही उलथा–पालथ होऊ शकते, याचा नेम नाही. मात्र जोपर्यंत मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा केली जात नाही, तोपर्यंत अनिश्चिता आहे, असे शिरसाट यांनी म्हटले आहे.

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात महायुतीला बहुमत मिळाले असले तरी अजूनही सरकार स्थापन झाले नाही. मुख्यमंत्रीपद आणि गृहमंत्रीपदावरुन रणकंदन सुरु असून एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदावरुन नाराज आहेत. ते त्यांच्या गावी जावून बसले असून विरोधकांकडूनही भाजपला चेकमेट करण्यासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. त्यातच सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार राज्यात पुन्हा एकदा राजकीय भुकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकनाथ शिंदे हे कधीही आणि कोणताही निर्णय घेऊ शकतात, असा सुचक इशारा शिंदे सेनेचे आ. संजय सिरसट यांनी दिला आहे.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदावर अडून बसले आहेत. गृहमंत्रिपद मिळाले तरच उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार अशी त्यांची भूमिका आहे. त्यातच ते आता त्यांचे मुळगाव असलेल्या साताऱ्यातील दरे इथे गेले आहेत, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना संजय शिरसाट यांनी मोठे वक्तव्य केले आहे, शिरसाट यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्रात पुन्हा एकदा राजकीय भूकंप पहायला मिळणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दोन दिवसापुर्वी शरद पवार गटाचे नेते आ. जितेंद्र आव्हाड यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. तसेच अजित पवार गटाचे ◀◀ पान २ वर

एकनाथ शिंदेंची प्रकृती बिघडली

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर येत आहे. त्यांना त्रास जाणवू लागल्याने ते आपल्या निवासस्थानीच विश्रांती घेत आहेत. एकनाथ शिंदे यांची प्रकती बिघडल्याने डॉक्टरांचे पथक तपासणीसाठी त्यांच्या दरे येथील निवासस्थानी दाखल झाले आहे.

ईव्हीएमवर संशय : निवडणूक आयोगाकडून काँग्रेसला चर्चेसाठी निमंत्रण



नवी दिल्ली । वृत्तसेवा

महाराष्ट्र निवडणूक मतमोजणीत फेरफार झाल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला होता. या आरोपांवर चर्चा करण्यासाठी आयोगाने ३ डिसेंबर २०२४ रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस शिष्टमंडळाला आमंत्रित केले आहे. तसेच सर्व कायदेशीर शंकांचे निरसन करणार असल्याचे आश्वासन देखील निवडणूक आयोगाने दिल्याच सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतमोजणी प्रक्रिया २३ नोव्हेंबरला पार पडली. यानंतर विरोधी पक्षातील बहुतांशी उमेदवारांनी ईव्हीएमवर शंका उपस्थित केली. त्यानंतर अनेक उमेदवारांनी आयोगाकडे फेरमतमोजणीची मागणी केली होती. ◀◀ पान २ वर

राज्य अन्न आयोगावर नियुक्तीबद्दल ॲड.सुभाष राऊत यांचा अधिसभेत गौरव

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल ॲड.सुभाष राऊत यांच्या अधिनंदनाचा ठराव विद्यापीठ अधिसभेत ठराव घेण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेची मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.३०) बैठक झाली. या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ.नरेंद्र काळे यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला.या ठरावस उपस्थित सर्व सदस्यांनी टाळ्याच्या गजरात अनुमोदन दिले. ॲड.राऊत हे महात्मा फुले समता परिषद राज्य उपाध्यक्ष, विद्यापीठ अधिसभा सदस्य, युवक महोत्सव सलल्लागर मंडळ सदस्य, नगरसेवक आदी पदावर कार्यरत राहिले आहेत.

तत्कालीन अन्न पुरवठा मंत्री मा.ना.छगन भुजबळ यांनी सदर नियुक्ती केली आहे.

भाजपच्या अभुतपूर्व यशाबद्दल भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबई येथील सागर निवासस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे यांनी शुभेच्छा देऊन सत्कार केला. यावेळी विशाल काकडे, दिनेश साबणे,विशाल दाभाडे,अशोक दोडताले आदी उपस्थित होते.

डॉ.बाबा आढावांच्या ईव्हीएम विरोधातील आंदोलनाला शरद पवार यांचा पाठिंबा

पवारांची पहिल्यांदाच जाहिर भूमिका, वाढलेली मतदानाची टक्केवारी धक्कादायक

पुणे । प्रतिनिधी

राज्यघटना आणि लोकशाहीची सुरू असलेली थट्टा यांचा निषेध व्यक्त करण्यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.बाबा आढाव हे महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून २८ नोव्हेंबर महात्मा फुले वाडा येथे आत्मक्लेश उपोषण सुरू केलं आहे. ◀◀ पान २ वर

आ.सुरेश धस म्हणजे दिलेला शब्द पाळणारा नेता

शेतकऱ्यांनी मागणी करताच कडा येथे काही तासात ट्रांसफार्मर बसविला शेतकऱ्यांत आनंद

आष्टी । प्रतिनिधी

कडा येथील महावितरणच्या ३३ केव्ही वीज उपकेंद्रातील ०५ मेगा व्होल्ट ॲम्पियर क्षमतेचे जनित्र (ट्रान्सफॉर्मर) दि.५ सप्टेंबर रोजी जळाल्याने कडा परिसरातील आठ ते दहा गावांचा विद्युत पुरवठा विस्कळीत झाला होता.

दोन दिवसांपूर्वी या परिसरातील शेतकऱ्यांनी मागणी केली असता याबाबीची तत्परतेने दखल घेत आ. सुरेश धस यांनी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांना दूरध्वनी वरून संपर्क करत तात्काळ ट्रान्सफार्मर देण्याची मागणी करताच सातारा येथे उपलब्ध असलेला ट्रान्सफॉर्मर मागविला असून तो आज बसविण्यात आला असल्याने अनेक

गावांचा ऐन रब्बी हंगामातील विजेचा प्रश्न मार्गी लागल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी जोरदार ट्रांसफार्मरचे स्वागत करून दबंग आमदार सुरेश धस यांच्या नावाच्या जयघोष करत नेता असावा तर असा..आ.सुरेश धस म्हणजे दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणत त्यांचे अभिनंदन करत स्वागत केले.

शनिवारी ट्रांसफार्मर कडा विज उपकेंद्रात दाखल झाला. त्याची विधिवत पूजा करताना सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे, उपसरपंच दिपक कर्डीले, सचिन घावटे,अन्सार सय्यद,सुभाष ढोबळे,भाऊसाहेब भोजने,महेश घोलप,अभिजित ढोबळे आदींसह परिसरातील शेतकरी उपस्थित दिसत होते.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: १.०० क्विंटल			
	३,०००	३,०००	३,०००
ज्वारी/हायब्रिड:१४५.५० क्विंटल			
	१,८७०	२,८७०	२,२४६
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : १.०० क्विंटल			
	८,०००	८,०००	८,०००
उडीद : २.०० क्विंटल			
	६,६००	६,६००	६,६००
बाजरी: २४.०० क्विंटल			
	२,५००	२,९४२	२,७८८
मुग :१.५० क्विंटल			
	६,५००	६,५००	६,५००
सोयाबीन: ३३०.५० क्विंटल			
	३,९००	४,२५०	४,१४७
हरभरा: १.०० क्विंटल			
	४,६००	६,४०१	५,५००

सन्मान कर्तृत्वाचा..!

आ. संदीप क्षीरसागर यांचा आज नागरी सत्कार

बीड । प्रतिनिधी

मतदार संघातील तरुणांच्या गळ्यातील ताईत असलेल्या आ. संदीप क्षीरसागर दिनांक एक डिसेंबर रोजी बीडमध्ये नागरी सत्कार होत आहे. खऱ्या अर्थाने हा सन्मान कर्तृत्वाचा, विकसनशील दृष्टीचा, तरुणांच्या नेत्याचा, एकनिष्ठतेचा आणि नेतृत्वातील साधेपणाचा. आ. क्षीरसागर यांच्या या नागरी सत्कारामुळे खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांना बळ मिळणार आहे.

बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये २०१९ च्या निवडणुकीत काका विरुद्ध पुतण्या अशी लढत होऊन यामध्ये तरुणाईच्या जोरावर संदीप भैय्या बीडचे आमदार झाले. गेल्या पाच वर्षांमध्ये त्यांनी मतदारसंघातील अनेक प्रश्न सोडवत जनतेमध्ये वेगळी छाप सोडल. विकास कामाच्या जोरावर आणि पक्षाशी एकनिष्ठ राहिल्याने बीड मतदार संघातील जनतेने त्यांना पुन्हा संधी देत दुसऱ्यांदा बीडचे आमदार केले.

बीड विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार संदीप क्षीरसागर यांचा भव्य नागरी सत्कार बीड येथे रविवारी (दि.१) रोजी होणार असून याप्रसंगी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नागरी सत्कार समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागर यांची तब्बल दुसर्यांदा आमदार पदी जनआशिर्वादाने निवडून आले आहेत. अनेक अडचणी, दबाव, संकटे यांना न जुमानता आ.क्षीरसागर आपल्या आणि पक्षांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिले. याचेच बक्षीस ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

लाभाच्या योजना : सत्ता आणण्याचे घातकी साधन...

महाराष्ट्रात लाडक्या बहिणींनी चमत्कार घडवला. जेमतेम १०० ते १२५ दिवसांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या महायुतीला मतदारांनी डबल इंजिनचे आमिष असूनही नाकारले होते, त्याच महायुतीला लाडक्या बहिणींनी केवळ चारच महिन्यांत अविश्वसनीय बहुमत प्रदान केले. झारखंडमध्येही हेमंत सोरेन सरकारने निवडणुकीच्या तोंडावरच 'मैय्या सन्मान' योजना सुरू केली. महिलांना दरमहा १ हजार रुपये देणाऱ्या या योजनेने सोरेन यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली झालेला तुरुंगवास हा त्यांच्यावर अन्याय होता असे मानावे लागेल. इतपत सोरेन यांच्यावर विश्वास ठेवत त्यांची सत्तावापसी केली. महायुतीने आता लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली आहे. तर झारखंडमध्येही 'मैय्या सन्मान' योजनेची रक्कम १ हजारवरून २५०० पर्यंत नेली जाणार आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की या योजनांच्या अंमलबजावणीत राज्यांच्या तिजोरीवर मोठा ताण पडणार आहे.

निवडणुकीचे राजकारण हे शेवटी मतांची बेगमीच असते. महिला एकहाती निवडणुकीचे चित्र बदलू शकतात याची खात्री झाल्यानंतर महिला मतदारांना खूश करण्याचे प्रयत्न सुरू झाले. यातून सुरू झालेली स्पर्धा आता शिगेला पोहोचली आहे. मात्र, राज्ये त्यातून निर्माण होणारे आर्थिक आव्हान कितपत पेलू शकतील हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. सध्याच्या घडामोडी पाहता एकच म्हणावे लागते की, चांगले राजकारण हे नेहमी वाईट अर्थकारणाची पायाभरणी करत असते. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये वेगवेगळ्या आघाड्यांचा विजय झाला. तरी त्यांच्या विजयात मात्र एक समान सूत्र आहे. या दोन्ही राज्यांमध्ये निवडणुकांच्या अगदी काही महिने अगोदर सुरू केलेल्या थेट लाभ देणाऱ्या योजना व विशेषत: महिलांच्या लाभाच्या योजना हे ते सूत्र. निवडणुकीच्या वेळी मतदारांना आमिष दाखवण्याचा पायंडा खूप जुना आहे. जी आश्वासने पूर्ण करता आली नाही किंवा होऊ शकली नाही त्यांची प्रिंटिंग मिस्टेक अथवा जुमला अशी सांभावना खुद्द आश्वासन देणाऱ्यांनीच केली होती, हा इतिहास सगळ्यांना ज्ञात आहे. तथापि, आता प्रत्यक्ष रोख रक्कमच खात्यांमध्ये जमा केली जात आहे. पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, हरियाणा आणि आता महाराष्ट्र व झारखंड या दोन राज्यांत महिलांना दिला जाणारा थेट लाभ आणि त्यामुळे महिलांनी दिलेला निर्णायक कौल यामुळेच लोकप्रियता ओहोटीला लागलेली सरकारे तगली आहेत. हाच अलीकडच्या धक्कादायक निकालांचा सार. या सर्व राज्यांमध्ये सरकारविरोधी नाराजीची पाटी पूर्ण पुसून कोरी केली गेली. जेव्हा एखादे सरकार सलग सत्तेवर असते तेव्हा त्याला मतदारांच्या नाराजीचा सामना करावाच लागतो. या नाराजीवर लक्ष्मी भंडार योजनेमुळे बंगालच्या ममता बॅनर्जी यांना मात करता आली. मध्य प्रदेशात भाजपच्या सरकारच्या दोन दशकांच्या राजवटीविरोधात नाराजीची लाटच होती. 'लाडली बहना' योजनेने ती लाट तर संपवलीच, पण योजना बंद होणार नाही किंवा करता येणार नाही एवढे भक्कम संख्याबळ भाजपला दिले. कर्नाटकात काँग्रेसची 'गृहलक्ष्मी योजना', तेलंगणात 'महालक्ष्मी योजना' झाली आणि येथील गृहलक्ष्मींनी दोन्ही राज्यांतील सत्ता काँग्रेसला बहाल केली. शेतकरी, ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या अन्य योजना सत्ताधाऱ्यांसाठी बोनस मिळवून देणाऱ्या ठरल्या. निवडणूक आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीत महिलांचे मतदान ५२,५८,६७१ एवढे वाढले. झारखंडमध्ये ८१ विधानसभा मतदारसंघांपैकी ६८ मतदारसंघांमध्ये महिलांचे मतदानाचे प्रमाण हे पुरुषांपेक्षा जास्त आहे. आणखी एक आकडेवारी असे सांगते की, महाराष्ट्रात आता लाडक्या बहिणींना दिली जाणारी रक्कम २१०० रुपये करण्यात आली, तर त्याकरता राज्याला अतिरिक्त निधी उभारावा लागेल. दरमहा साधारण पाच हजार कोटी रुपयांचा हा खर्च आहे. सरकारने ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सांगण्यात आले. हे पैसेही कर्जाद्वारे उभे केले गेले आहेत. राज्यावर अगोदरच ९ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. लाडके भाऊ आणि अन्य योजनांसाठी वर्षाला अतिरिक्त ६० हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. जे महाराष्ट्रात होणार तेच अन्य राज्यांतही होणार आहे. मध्य प्रदेशपुरते बोलायचे झाले, तर या राज्याने वर्षभरातच ४९ हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. इतर राज्यांवरही बोजा पडत असल्याच्या बातम्या रोजच येत आहेत. लाभार्थींना थेट रोख रक्कम दिल्यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा भागवता येण्यास मदत होते, असे सांगत काही जागतिक संस्थांनी भारतात सुरू असलेल्या या योजनांची प्रशंसाही केली होती. मात्र त्यांनी जेव्हा प्रशंसा केली होती त्यावेळी एकटे केंद्र सरकार थेट आर्थिक मदत देत होते. आता प्रत्येक राज्यात सरकार टिकवण्याचे हुकुमी साधन म्हणून थेट लाभाच्या योजना सुरू केल्या जात असल्यामुळे आर्थिक गणित बिघडणारच नाही तर कोलमडणारही आहे. अर्थात, चांगल्या राजकारणासाठी म्हणून जे काही सुरू केले जाते ते अंतत: अर्थकारणाच्या मुळावरच उठणारे असते.

पान १ वरून...

ईव्हीएमवर संशय :

या मागणीला केंद्रीय निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाने निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ही पारदर्शक झाली आहे. निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवार त्यांच्या एजंटांच्या सहभागासह पारदर्शक प्रक्रियेचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. तसेच राजकीय पक्षांच्या सहभागासह पारदर्शक मतदार यादी अद्ययावत प्रक्रिया केल्याचेही आयोगाने म्हटले आहे. तसेच वैयक्तिकरित्या प्रत्येक उमेदवाराचे लेखी ऐकल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या सर्व समस्यांचे कायदेशीररित्या पूर्तता करणार असल्याचे आश्वासन देखील केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहे.

सन्मान कर्तृत्वाचा

म्हणून बीडच्या जनतेने आ.संदीप क्षीरसागरांना दुसर्यांदा विधानसभेत पाठवून प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आमदार क्षीरसागर यांचा हा सन्मान त्यांच्या कर्तुत्वाचा, एकनिष्ठतेचा, तरुणाईच्या नेतृत्वाचा, नेतृत्वातील साधेपणाचा आणि विकासातील दूरदृष्टीपणाचा आहे.

आ.संदीप क्षीरसागर दुसर्यांदा आमदार झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी बीड शहर नागरी सत्कार समितीच्या वतीने रविवारी (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे सकाळी ११ वा. भव्य नागरी सत्कारा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मायबाप मतदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा असे आवाहन नागरी सत्कार समितीकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात पुन्हा

नेते आ. दिलीप वळसे पाटील यांनी सुध्दा याच दरम्यान शरद पवारांची भेट घेत चर्चा केली होती. शिवाय अजित पवार गटाचे आ. नरहरी झिरवाळ यांनी सुध्दा शरद पवार आणि अजित पवार कधीही एकत्र येऊ शकतात, असे सांगितले होते. त्यामुळे सध्या सत्तेवरुन जे राज्यात महाभारत सुरु आहे, त्यावरुन तरी काही तरी वेगळे घडणार असल्याचे दिसते. भाजपला बाजूला ठेऊन दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, दोन्ही शिवसेना आणि काँग्रेस अशी महाआघाडी स्थापन होऊन राज्यात त्यांचे सरकार सुध्दा येऊ शकते, असा अंदाज सुध्दा व्यक्त केला जात आहे.

डॉ.बाबा आढावांच्या ईव्हीएम

बाबा आढाव यांचे आत्मक्लेश उपोषण तीन दिवसांपासून सुरू आहे. त्यांच्या उपोषण स्थळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी भेट दिली. त्याचबरोबर त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा असल्याचेही स्पष्ट केले.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, निवडणुकांमध्ये सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा महापूर या गोष्टी यापूर्वी कधीही बघितल्या नव्हत्या. स्थानिक पातळीवरच्या निवडणुका असतात, त्या ठिकाणी असे कुठेतरी ऐकायला मिळते असे नाही. परंतु संपूर्ण राज्याच्या आणि देशाच्या निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसा आणि सत्तेचा गैरवापर करून संपूर्ण यंत्रणाच हातात घेतली हे चित्र यापूर्वी दिसलेले नव्हत, पण हे आता महाराष्ट्रात बघायला मिळाले. आता त्याचा परिणाम लोकांमधील अस्वस्थता वाढली असून लोकांमधील चर्चा असल्याचेही यावेळी सांगितले. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, आज कुणीतरी अशा रीतीने पाऊल प्रभावी पाऊल टाकण्याची आवश्यकता आहे. हा लोकांच्यातील चर्चेचा सूर आहे, आणि त्याच्यात माहिती कळली बाबा आढाव यांनी पुढाकार घेतला, आणि ते स्वतः महात्मा फुले यांच्याशी संबंधित वास्तूमध्ये बसलेले आहेत. एक प्रकारचा दिलासा बाबांच्या या उपोषणाने सामान्य लोकांच्यामध्ये येतो आहे असें मला स्पष्ट दिसते. राष्ट्रीय कर्तव्य आणि देशाची आवश्यकता म्हणून ही भूमिका घेतली. पण त्यांनी एकट्यानेच ही भूमिका घेणे हे काय सोयीचे नाही. त्यांनी एक प्रकारे जनतेचा उठाव या माध्यमातून केला आहे. संसदीय लोकशाही पद्धती ही उद्ध्वस्त होईल असे चित्र या ठिकाणी दिसते. देशाचे सूत्र आज ज्यांच्या हातात आहेत त्यांना याची काही पडलेली नाही इतकी चर्चा संबंध देशात असल्याचेही यावेळी पवार यांनी सांगितले.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, आता ५ डिसेंबरला शपथविधी होण्याची शक्यता आहे. याचा अर्थ लोकांचे बहुमत याला काही महत्त्व नाही. जे काही चाललेय ते राज्यासाठी अशोभनीय असल्याची टीकाही त्यांनी केली. इतकी चर्चा देशात आहे. संसदेत हा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न दोन्ही सभागृहात विरोधकांनी केला तर त्यांना बोलू दिले जात नाही. ६ दिवसांच्या अधिवेशनात रोज सकाळी ११ वाजता दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेते हा मुद्दा मांडायला आम्हाला परवानगी द्या एवढी मागणी करतात पण ६ दिवसात एकदाही मंजूर झाली नाही. संसदेत देशाच्या कुठल्याही प्रश्नांची चर्चा होऊ शकली नाही. याचा अर्थ संपूर्ण संसदीय लोकशाही पद्धतीवरच राज्यकर्त्यांचा आघात आहे. लोकांमध्ये जावे लागेल, लोकांना जागरूक करावे लागेल. उठाव करायला हवा. आज त्याची आवश्यकता आहे. बाबांच्या आंदोलनामुळे हे आज ना उद्या उठाव झाल्याशिवाय राहणार नाही असेही यावेळी बोलताना पवार म्हणाले.

शेवटी बोलताना शरद पवार म्हणाले की, सत्तेचा गैरवापर आणि बड्या लोकांना संरक्षण या दोन्ही गोष्टी दिसतात. माझ्याकडे आता पुरावा नाही, काही लोकांनी निदर्शनास आणून दिले आहे. काहींनी प्रेझेंटेशन दाखवले, आम्ही त्यांच्यावर फार विश्वास ठेवला नाही, कारण आम्हाला वाटत होते, निवडणूक आयोग इतकी चुकीची भूमिका घेणार नाही. निवडणूक आयोगावर आम्ही संशय व्यक्त केला नाही, परंतु निवडणुकीनंतर यात तथ्य आहे हे दिसून येते. फेर मतमोजणीत काही समोर येईल असे वाटत नाही. मतदानाच्या शेवटच्या २ तासांमधील जी आकडेवारी समोर येत आहे ती धक्कादायक आहे. बाळासाहेब थोरातांसह अनेकांनी अशी माहिती समोर आणली आहे. त्याचा विचार करावा लागेल. इंडिया आघाडीने एकत्रितपणे हा विषय चर्चेत घ्यावा अशी चर्चा आहे. सोमवारी किंवा मंगळवारी याबाबत निर्णय होईल अशी आशाही यावेळी त्यांनी व्यक्त केली.

सौताड्यात आढळला माजी सभापतींचा मृतदेह

बीड । प्रतिनिधी

पाटोद्याचे माजी सभापती गोवर्धन सानप यांचा मृतदेह सौताडा येथे आढळून आला आहे. मागील दोन दिवसांपासून ते बेपत्ता होते. अखेर आज दुपारी त्यांचा मृतदेह सौताडा येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्यासह पोलिसांची टीम घटनास्थळी दाखल झाल्याचे कळते. गोवर्धन सानप आ.सुरेश धस यांचे कार्यकर्ते होते.काही वर्षांपूर्वी त्यांना पंचायत

समितीचे सभापती करण्यात आले होते. मागच्या दोन दिवसांपासून ते बेपत्ता असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली होती. आज त्यांचा मृतदेह आढळून आला आहे.सानप यांनी आत्महत्या केली की त्यांचा घातपात करण्यात आला याचा शोध पोलीस घेत आहेत.

गोळीबाराच्या चर्चा पण....

गोवर्धन सानप यांची गोळया झाडून हत्या करण्यात आल्याच्या चर्चा होत्या. पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी प्रजापत्रशी बोलताना मात्र गोवर्धन सानप यांची हत्या झाली नसल्याचे सांगितले असून गोळीबाराच्या अफ़वा आहेत असे स्पष्ट केले. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेहाची तपासणी केल्यानंतर खरे कारण आता समोर येणार आहे.

जाहीर प्रगटन

मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात. किरकोळ दिवाणी अर्ज १६३९/२०२४

सुमन उत्तमराव शिदि व इतर विरुध्द निरंक

ॲड. कुंभार एस. आर.

अर्जदारः १) सुमन भ्र. उत्तमराव शिंदे, वयः ६५ वर्षे, धंदाःनील, रा. शिदोड ता. जि. बीड २) सचिन पि.उत्तमराव शिंदे, वयः ४५वर्षे, धंदा नौकरी, रा. सदर ३) नितीन पि.उत्तमराव शिंदे, वयः ४१ वर्षे, धंदाः मजुरी, रा. जालना रोड बीड ता.जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्जः– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे उत्तम मनाजी शिदि यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे उत्तम मनाजी शिदि रा. शिदोड ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : ०६.०५.२००६ रोजी सरकारी दवाखाना बीड ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार कं. १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील या पुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत उत्तम मनाजी शिदि यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/११/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १६/१२/२०२४.

क. लिपीक

आदेशावरुन,
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

शनी अमावस्या निमित्त हजारो भाविकांनी घेतले शनि महाराजांचे दर्शन

श्रीक्षेत्र राक्षसभुवन ; शनि महाराज कि जय; घोषणांनी परीसर दणदणला

गेवराई । प्रतिनिधी

भारतातील साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील शनि महाराज देवस्थानाचे विशेष महत्त्व असुन ते प्रसिध्द देवस्थान आहे. तर शानिवार दि.३० नोव्हेंबर रोजी शनी अमावास्या निमित्त याठिकाणी राज्यासह परराज्यातून भाविकांनी शुक्रवारी मध्यरात्री पासुनच श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे शनी महाराजांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी शनि महाराज कि जय अश्या जोरदार घोषणांनी परीसर दणाणून गेला होता.

गेवराई तालुक्यातील श्री क्षेत्र राक्षसभुवन येथे शनीच्या साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असून शनिवारी शनि अमावास्या निमित्त

शनी महाराजांच्या दर्शनासाठी हजारोच्या भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी शनीभक्तांनी शिस्तबद्ध पध्दतीने रांगेत उभा राहून दर्शन घेतले. तसेच या ठिकाणी पानफुल, नारळ, तेल , सुप्रसिद्ध पेढे व रेवडी सह खाऊवाल्यांचे दुकाने मोठ्या प्रमाणात थाटण्यात आले होते. तर शनी अमावस्या निमित रूद्र अभीषेक , शनि शांति ,शनिजप ,नवगृह जप तसेच अभिषेक करण्यासाठी भाविकांनी मंदीरात मोठी गर्दी होती. यावेळी बीड, गेवराई, चकलंबा, उमापुर सह तलवाडा येथील पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

भारतातील साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभूवन येथे शनि अमावस्या निमित्ताने यावर्षी भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले होते. यामध्ये भाविकांना शिस्तीत दर्शन घेता यावे यासाठी दर्शन रांगेचे नियोजन , महीलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच वाहनांसाठी चार एक्कर मध्ये पार्किगची व्यवस्था करण्यात आली होती. तर भाविकांनी शनि महाराजांच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती. तर जवळपास पन्नास हजारांपेक्षा जास्त भाविकांनी दर्शन शनि महाराजांचे दर्शन घेतले आहे .

– संतोष विजयकुमार काठवटे
अध्यक्ष, श्रीक्षेत्र शनि महाराज देवस्थान, राक्षसभुवन

पान १ वरून...

अंबाजोगाईत मोबाईल हिसकावुन

मोबाईल त्यांनी पाई जाणार्या पादचार्याचा हिसकावुन चोरी केला होता अभिलेख पाहता अंबाजोगाई शहर येथे गुरनं ४६१/२०२४ कलम ३०४(१) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयाची नोंद मिळुन आली. त्यानंतर त्यांचे ताब्यात दोन विनानंबरच्या दोन होंडा शाईन मोटार सायकली मिळुन आल्या अभिलेख पाहता १) पो.स्टे.यु.वडगाव गुरनं १७३/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. व पो.स्टे.परळी ग्रामीण गुरनं २३०/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयात चोरी असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी निखील लक्ष्मण घाडगे वय २० वर्षे रा.दौनापुर ता.परळी हा जबरी चोरीचे गुन्हयात निष्पन्न्? झाला व दोन विधीसंघर्षग्रस्त बालके त्याचे इतर एक मित्रासह जबरी चोरी व मोटार सायकल चोरी अशा चार गुन्हयात निष्पन्न झाल्याने त्यांचे कडुन चोरीचे दोन मोबाईल व दोन चोरीच्या मोटार सायकली व गुन्हा करण्यासाठी वापरलेले स्पेंडर मो.सा. असा एकुण २,१०,०००/– रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपींना पो.स्टे.अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास अंबाजोगाई शहर करीत आहेत. सदरची कामगिरी ही अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पो.नि.श्री. धिरज घोळवे अंबाजोगाई शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोउपनि हनुमान खेडकर, पोह/मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, राजु पठाण, अश्विनकुमार सुरवसे, चालक नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

विद्यार्थ्यांची स्वप्ने मोठी

त्यांनी यावेळी सांगीतले. याप्रसंगी संस्थेच सचिव प्रा. जयजीत शिंदे, प्राचार्य प्रा. एन. के. हजारे, प्रा. पी. एस. तरकसे, एस. एन. घुले. बी. यु. औताडे, बी. डी. उगले, जे. पी. काकडे, उमेश तट यांच्यासह इतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

आईसाठी प्रशासकीय सेवेत

वडीलांच्या स्वप्नपूर्तीसाठी डॉक्टर तर आईच्या तीव्र इच्छेमुळे मी प्रशासकीय सेवेमध्ये आलो असल्याचे डॉ. महेश घाटूळे यांनी सांगीतले. तसेच कोणताही क्लास न लावता केवळ जीद्द आणि चिकाटीच्या जोरावर एमपीएसी परीक्षेत महाराष्ट्रात पहीला येण्याचा मान मिळवल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले.

निसटत्या पराभवाचा

मोठया दिलदार पणे स्वीकार करून मतदारसंघातील अवघ्या १,१४,३९४(एक लाख चौदा हजार तीनशे चौर्यांनऊ) मतदारांनी मतदानरुपी दिलेल्या आशीर्वादाबद्दल त्या सर्व मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी पृथ्वीराज साठे यांनी संपूर्ण मतदारसंघात गुरुवार दि २८ पासून मतदारांसाठी आभार दौरा सुरु केला आहे. या दौऱ्यात जागोजागी मतदार बंधू भगिनी या अत्यंत भावूक होऊन पृथ्वीराज साठे यांचे स्वागत करत करून त्यांनी दाखवलेल्या दिलदार पणाचे कौतुक देखील करताना दिसून येत आहेत.केज विधानसभा मतदार संघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून निवडणुक लढवण्यासाठी उभे होते. मतदानावेळी उमेदवारी जाहीर होण्यासाठी झालेल्या विलंबामुळे प्रचारासाठी अत्यंत कमी कालावधी मिळाला होता. मात्र अशाही परिस्थितीत त्यांनी रात्रीचा दिवस करून संपूर्ण मतदार संघ पिंजून काढत प्रत्येक मतदारपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी देखील झाले होते. त्याचेच फलित म्हणून पृथ्वीराज साठे यांना केज मतदार संघातुन १,१४,३९४ मतदान मिळाले आहे. मतदान दिलेल्या सर्व मतदारांचे आभार व्यक्त करणे हे आपले कर्तव्य असल्याच्या भावनेने पृथ्वीराज साठे यांनी दि २८ गुरुवार पासून मतदारांचा आभार दौरा सुरू केला आहे. आजपर्यंत पृथ्वीराज साठे यांनी आभार दौऱ्यादरम्यान मतदार संघातील, आनंदवाडी, मांडवखेल, कळसंबर, भंडारवाडी, कारेगव्हाण, वडगाव कळसंबर, सोनपेठ, जैताळवाडी, येळंबघाट, खर्डेवाडी, धावाज्याचीवाडी, पांढऱ्याचीवाडी,बाळापूर,अंबिल वडगाव, सात्रा पोतरा,मुर्षदपूर, सावरगाव, अंधापुरी, नेकनूर, श्री क्षेत्र चाकरवाडी टाकळी, कोरेगाव, शिरपूर,जाधवजवळा, कदमवाडी,डोणगाव,मस्साजोग, आरणगाव, काळेगाव, पिंप्री, कापरेवाडी, केवडगाव, बोरगाव, भोपळा,वरपगाव,चिंचोली, सारूकवाडी, डोका, सातेफळ, हदगाव, मांगवडगाव, लाखा, आणि साळेगाव गावात प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील गावकऱ्यांचे व मतदारांचे आभार व्यक्त केले.या भेटीदरम्यान पृथ्वीराज साठे यांच्या निसटत्या पराभवामुळे मतदार बंधू भगिनींच्या डोळ्यात अश्रू दाटून आल्याचे अनुभवताच साठे देखील अनेक वेळा गहिवरून येत होते. मात्र उलटपक्षी साठेच मतदारांना खचून जाऊ नका यापुढेही मी सदैव आपल्या सुखदुःखाचा साक्षीदार होणार असल्याचे सांगत आपण यापुढेही एकदिलाने काम करण्याचे आवाहन करत होते. महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना केज मतदार संघातून मतदारांसह खासदार बजरंग सोनवणे, राजकिशोर मोदी,डॉ नरेंद्र काळे, हारून इनामदार, श्रीमती सीताताई बनसोड, सुरेशताऱ्या पाटील यांच्यासह अनेक नेत्यांची मोलाची साथ मिळाली.

सद्गुरु बाबा व डोंगराच्या

भव्य स्वरुप आले होते.

बुधवारी (दि.२७) दुपारी गाड्या ओढण्याचा कार्यक्रम तर सायंकाळी सद्गुरु बाबांच्या पादुका असलेली पालखी मंदिर ते गाव (कासारी) अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. तत्पुर्वी महाप्रसादाचे आयोजन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. गावात व परिसरात सर्वत्र भक्तीमय व प्रसन्न वातावरण होते. गुरुवारी दुपारी कुस्त्यांचा जंगी सामना यात्रे दरम्यान रंगला. समस्त कासारी गावकऱ्यांच्या देखरेखीखाली कुस्तीची दंगल सुरू करण्यात केली. यावेळी दहा वर्षीय वयोगटापासून ते ओपन (९६ किलो) पर्यंत कुस्त्यांची दंगल रंगली. दहा रुपयांपासून अकरा हजार रुपयांची बक्षिसे दंगलीत जिंकलेल्या मल्लांना जाहीर करण्यात आली. सायंकाळी सहा वाजता शेवटची कुस्ती अकरा हजार रुपयांची महावीर केसरी दिपक कराड (रुई रामेश्वर, लातूर) यांची कुस्तीपटू मनोज पवार आष्टी यांच्यासोबत खेळवण्यात आली. ही कुस्ती दीपक कराड याने जिंकली. तर खेलो इंडिया चॅम्पियन सुमीत बारस्कर (पुणे) व भरत कराड (रुई रामेश्वर, लातूर) या दोन्ही मल्लात दोन नंबरची रुपये अकरा हजार ची कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली. दरवर्षी सांस्कृतिक सामाजिक उपक्रम राबवत भरणाऱ्या या यात्रेला प्रशासनाने देवस्थानाला तीर्थक्षेत्र दर्जा देऊन यात्रेसाठी सेवा, सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी भाविकांतून व्यक्त होत आहे.

कासार येथील कुस्त्यांच्या रंगलेल्या दंगलीत महावीर केसरी दिपक कराड (रुई रामेश्वर लातूर) विरुद्ध मनोज पवार (आष्टी), खेलो इंडिया चॅम्पियन सुमीत बारस्कर (पुणे) विरुद्ध भरत कराड (रुई रामेश्वर, लातूर), वैष्णवी साळुंखे (जालना) विरुद्ध पल्लवी माने (यवतमाळ) यांच्या लढती लक्षवेधक व रोमांचकारी झाल्या.

आ.सुरेश अण्णा धस यांचा

शेतकरी समृद्ध झाला आहे तसेच आमदार सुरेश धस आण्णा यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली असुन मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. म्हणून त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून आष्टी पाटोदा शिरुर विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना विक्रमी मतदान देऊन आमदार केले असून पक्षश्रेष्ठीने त्यांना मंत्रीपद देऊन त्यांच्या विकासात्मक कामाचा गौरव करावा अशी मागणी युवा नेत्रत्व शहाबाज सय्यद यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

रब्बी पिकांच्या पिक स्पर्धेत

भागांमध्ये शेतक–यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक–यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक–यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतक–यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत

अन्नधान्य,कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा राबविण्यात येत आहे.या पीक स्पर्धेत ज्वारी,गहू, हरभरा, करडई व जवस या ५ रब्बी पिकांचा समावेश असून या स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे.सदर शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल.पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. अर्ज करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र–अ),ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन,७/१२, ८–अ चा उतारा,जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास) तसेच पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा आवश्यक आहे.

रब्बी हंगामामध्ये पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख ३१ डिसेंबर राहील स्पर्धेसाठी

तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते निवडण्यात येतील.या स्पर्धेसाठी पिकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम ३०० तर आदिवासी गटासाठी रक्कम १५० रुपये शुल्क राहील. सर्वसाधारण व आदिवासी गट यासाठी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय असे तालुका पातळी ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये,जिल्हा पातळी १० हजार,७ हजार व ५ हजार रुपये तर राज्य पातळी ५० हजार,४० हजार व ३० हजार रुपये असे राहिल. या पिक स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी सर्व शेतकरी बंधु–भगिनींनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन श्री. गंडे यांनी केले आहे.

न्यू व्हिजन पब्लिक स

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.१ डिसेंबर २०२४

पालक-विद्यार्थी संवाद महत्वाचा-डॉ.बापूराव मरलापल्ले

बीड। प्रतिनिधी

बीड राबवत असलेल्या मेंटोर मेंट्टी उपक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलपल्ले यांनी बोलताना सांगितले की,शिक्षणाबरोबरच मुलांनी चारित्र्यसंपन्न बनले पाहिजे,चांगले संस्कार अंगी बाळगून समाजात आपली प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे,चांगल्या गोष्टी अंगीकृत केल्या पाहिजेत,नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन गोष्टी शिकल्या पाहिजेत त्यासाठी आमचे महविद्यालय ही नेहमी प्रयत्नशील आहे.विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानात भर पाडण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवत आहोत,विद्यार्थ्यांच्या अभ्यासासोबत सर्वांगीण विकासासाठी विविध खेळ,वाचन हे त्यांच्या वेळापत्रकामध्ये सामाविष्ट करण्यात येणार आहे.तसेच विद्यार्थ्यांनी मोबाईल चा वापर कमी करावा तसेच नवीन गोष्टी शिकण्यासाठी वापर करावा. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक-विद्यार्थी संवाद हा किती महत्वाचा आहे याबद्दल उपस्थित पालकांना सांगितले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांनी प्रश्न-उत्तरांच्या माध्यमातून आपल्या समस्यांचे निराकरण करन घेतले.

कवितेशी बुद्धीपेक्षा भावनेचा संबंध येतो-प्रा.सुनिता सांगोले

शिरूर। प्रतिनिधी

वाचनाने मस्तक सशक्त होते.परंतु वाचन संस्कृती लोप पावत चाललेली असून ही अतिशय चिंताजनक बाब आहे.नवकवी,लेखकांनी जुन्या जाणत्या साहित्यिकांचे साहित्य वाचायला हवे त्याशिवाय आपल्या लिखाणाचा दर्जा सुधारणार नाही.स्वानुभवातून आलेली अभिव्यक्ती म्हणजे कविता असून ती फक्त ऐकण्याचा भाग नसून आस्वादण्याचा विषय आहे असे प्रतिपादन लातूर येथील दयानंद महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिता सांगोले यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी निमित्त एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित ३२ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनाच्या उद्घाटक पदावरून त्या बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.भास्कर बडे होते.एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणीचे संचालक साहित्यिक अनंत कराड,सचिव पत्रकार गोकुळ पवार,प्रदेश संघटक देवीदास शिंदे, प्रदेश प्रवक्ता मल्हारी खेडकर,विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे,परभणी महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे,मुक्त सृजनचे अध्यक्ष प्रा.डॉ.महेश खरात,जेष्ठ कवयित्री नयन राजमाने,ज्ञानेश्वर हंडरगुळीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कविसंमेलनात इंजि.जयराम कदम (जालना) यांनी 'हरवलेला संवाद', 'अराजकीय' व 'लोकशाही' या दर्जेदार रचना पेश केल्या.औरंगाबादचे कवी दशरथ शिंदे यांच्या 'बाई शाळेच्या गं दारी' व 'गरीबाची गाय' या गेय कवितांनी श्रोते भारावून गेले.दिपक पांढरे (माजलगाव) यांनी 'अमृत वचन' रचना सादर केली. त्यानंतर पैठण जि.संभाजीनगर येथील कवी रविंद्र काळे यांनी 'पुस्तकं' ही कविता ऐकवून रसिकांना अंतर्मुख केले.अहमदपूर जि.लातूर येथील मुरहारी कराड यांची 'सुरवात' ही कविता लक्षवेधी ठरली.'घेत आहे काळजी इतकी तुझी' ही गझल खामगाव जि.बुलढाणा येथील युवाकवी निखिल चोपडे याने पेश करून संमेलनात रंगत आणली.उदगीर जि.लातूर चे कवी चंद्रशेखर मलकमपट्टे यांनी 'गोट्यांचा डाव' व 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या दिर्घ कवितेतील एक तुकडा पेश करत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.शिरूर कासार चा युवा कवी कार्तिक कांबळे याने 'भारतीय म्हणून जगावं' ही रचना पेश केली. आष्टी जि.बीड चा युवाकवी नवनाथ पोकळे याने 'भरली शिक्षणाने झोळी', सुरेखा कुलकर्णी (सातारा) यांनी 'सावित्री', नागेश बोंतेवाड (संभाजीनगर) यांनी 'ज्ञानगंगा घरोघरी', प्रेमा कुलकर्णी (माजलगाव) यांनी 'लखलाभ तुला रे बाळा', प्रा.डॉ.महेश खरात यांनी 'हे तुजला जमते तरी कसे' आणि अनिता वलांडे (शिरूर अनंतपाळ) यांनी 'ज्योतिबास स्मरूया' या दर्जेदार रचना सादर करून रसिकांना खिळवून ठेवले.सूत्रसंचालक एकताचे अहिल्यानगर जिल्हा प्रसिद्धीप्रमुख पत्रकार बाळासाहेब कोठुळे यांनी 'राजकारण' कविता सादर करत महोल बदलून टाकला.या संमेलनाचे प्रस्ताविक एकताचे नेवासा तालुका प्रतिनिधी गोरक्षनाथ पवार आणि आभारप्रदर्शन एड.संजय माकोणे (नेवासा) यांनी केले.या वेळी एकताचे पैठण तालुकाध्यक्ष शहादेव सुरासे,लता बडे,प्रा.डॉ.द्वारका गिते,राजू वाघमारे, भगवान अमलापुरे,गणेश वासवे,गोविंद यादव,राजश्री ढाकणे, रविंद्र काळे, बी.टी.सांगळे,वैभव शिंदे,भारत बिराडे,पल्लवी भोसले,गोविंद मोगले,जयपाल मेकाले यांच्यासह राज्यभरातील अनेक कवी कवयित्रींनी सहभाग घेतला.

मोफत मधुमेह तपासणी शिबिरात १६०० रुग्णांची तपासणी व औषधोपचार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजात वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी विविध उपक्रम राबवत, मधुमेहींची मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी सदैव अग्रेसर असणारे मधुमेह तज्ज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी १६०० रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले. या उपक्रमाचे त्यांचे १२ वर्ष आहे. गुरुवारी येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,आयएमए , ॲम्प्पा, व योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर, प्रशांत नगर, अंबाजोगाई यांच्या वतीने मधुमेहावरील महाशिबीर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटक म्हणून आयएमए चे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. रामकृष्ण लोंढे, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास होते. तर प्रमुख अतिथी म्हणून आयएमए चे अंबाजोगाई अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, डॉ.श्रीनिवास रेड्डी, डॉ.राजेश इंगोले, डॉ.सुलभा पाटील, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, संयोजक डॉ अतुल शिंदे,डॉ.स्वाती शिंदे यांची उपस्थिती होती.या शिबिरात मधुमेह तज्ज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी १६०० रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले. तसेच मधुमेह रोखण्यासाठी युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रत्येक महिन्यात मोफत रक्त तपासणी शिबिर सुरू असल्याचे सांगितले. मधुमेह कसा रोखता येईल? यासाठी त्यांनी अनेक उपाय सांगून जीवन जगताना आहार,व्यायाम व तणावमुक्त जीवन जगण्याचा सल्ला दिला.यावेळी बोलताना गणपत व्यास म्हणाले की डॉ.अतुल शिंदे हे सेवाभाव जोपासून आरोग्य सेवा देतात.समाजाशी असलेली बांधिलकी त्यांनी जोपासली म्हणूनच आज अनेकजण मधुमेहाच्या दुष्परिणामा पासून दूर आहेत. यावेळी डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ. नवनाथ घुगे, डॉ श्रीनिवास रेड्डी, डॉ सुलभा पाटील,डॉ.राजेश इंगोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे संचालन विनायक मुंजे यांनी केले.तर आभार धनराज सोळंकी यांनी मानले.

भाशिप्र संस्थेच्या ब्रीद वाक्याला सार्थ कार्य करत आहे -अरुणा डोंगरे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा. शि. प्र. संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील ग्रंथालय परिचर श्रीमती अरुणा विश्वनाथ डोंगरे यांचा शासकीय नियमानुसार निवृत्तीचा सेवा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर भा. शि. प्र संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाश दुगड, स्थानिक पदाधिकारी सुरेंद्र रेदासनी, ऍड. विश्वासराव जोशी, अभय कोकड, प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी माता सरस्वती व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ जिजाराम बागल यांनी केले.सत्कारमूर्ती अरुणाताई डोंगरे व त्यांचे कुटुंबीय यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान पूर्ण आहेर देवून करण्यात आला.तसेच अर्थशास्त्र विषयाचे प्रा. नामदेव हेडे यांनी विद्यावाचस्पती (पी. एच डी.)पदवी संपादन केल्यामुळे त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी कर्मावर निष्ठा ठेवत त्या सतत कार्यरत राहिल्या.असे म्हटले तर संकुलाचे स्थानिक कार्यवाह विश्वासराव जोशी यांनी नियुक्ती आणि निवृत्ती ही एकाच ठिकाणी होणे हे भाग्य डोंगरे ताईंना लाभले असे म्हटले.प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी संघर्षाच्या परिस्थितीत त्या सतत कार्यरत राहिल्या आरोग्याची समस्या असतांनाही त्यांनी उत्तम कार्य केले असे सांगितले.या प्रसंगी डोंगरे ताईंच्या सेवेचा गौरव सन्मानपत्राचे वाचन करून उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना यांनी केला.यावेळी कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी, सुरेश बनसोडे, आनंद डोंगरे यांनीही गौरवपर मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे यांनी डोंगरे ताईंना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य यांनी म्हटले की, भा.शि. प्र संस्थेच्या उक्तीला सार्थ ठरवत अरुणाताईनी सेवा केली. नोकरी म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांवर संस्कार रुजवण्याचे कार्य त्यांनी छोट्या छोट्या गोष्टीतून केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ ज्ञानेश्वर गवते यांनी केले.या सेवा गौरव कार्यक्रमासाठी डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर, प्रा स्नेहलताई पाठक, ओंकार खुर्पे, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे , जेष्ठ पत्रकार तुकाराम येवले, सुभाष नाकलगावकर, दिलीप झगडे यांचेसह शहरातील प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी यांची बहुसंख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता आभार व शांतीमंत्राने उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना यांनी केली.

दत्ता महाजन यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

माजलगाव। प्रतिनिधी

भाजपा सोशल मीडियाचे मराठवाडा संयोजक दत्ता महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त देवखेडा तालुका माजलगाव येथील गोशाळेस ५००० रुपयांची देणगी दिली , तसेच साधारण ४० ते ५० सिद्धेश्वर शिशुविहारच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले . गेल्या आठ ते नऊ वर्षापासून कुठलीही बॅनरबाजी न करता सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी दत्ताजी महाजन वाढदिवस साजरा करतात त्याच प्रमाणे यावर्षी देखील अतिशय साध्या पद्धतीने सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा केला. यावेळी या कार्यक्रमास उपस्थित भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री विश्वास जोशी साहेब, श्री सुरेंद्र रेदासणी , प्रशांत भानप, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉक्टर प्रशांत पाटील रा स्व संघाचे जगदीश साखरे , नगरसेवक विनायक रत्नपारखी ,कैलास जोशी रमाकांत जवळेकर, गो शाळेत अविरत सेवा कार्य करणारे भुतडासेठ , लोहियासेठ , मालपाणी सेठ, सिद्धेश्वर शिशुविहारच्या पांडे मॅडम व सर्व स्टाफ उपस्थित होता.

सदाभाऊ खोत यांना मंत्रिमंडळात स्थान द्या -नामदेव मंडपे

मंठा। प्रतिनिधी

शेतकरी नेते सदाभाऊ खोत यांना महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणी रयत क्रांती संघटनेचे जालना जिल्हाध्यक्षव नांदेड संपर्कप्रमुख गजानन राजबिंडे आणि राज्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांची सदाभाऊंना मंत्रिमंडळात स्थान मिळवण्यासाठी आग्रही आहेत रयत क्रांती संघटनेचे सर्वेसर्वा व महायुतीचे घटक पक्ष असलेल्या रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते सदाभाऊ खोत गेल्या अनेक वर्षांपासून महायुतीमध्ये निष्ठेने काम केले आहे. महायुतीतील अनेक उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले हातकलंगले लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री धैर्यशीलजी माने यांना २०१९ व २०२४ या दोन्ही लोकसभेमध्ये निवडून आणण्याचे काम सदाभाऊ खोत यांचा सिंहाचा वाटा आहे त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील मोठा शेतकरी वर्ग हा सदाभाऊ खोत यांचा चाहता आहे शिवाय गेल्या अनेक वर्षापासून सदाभाऊ खोत हे महायुतीचे व महायुतीच्या सरकारची कार्य सर्वसामान्य जनतेपर्यंत व शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील रयत क्रांती संघटनेचे सर्वच पदाधिकारी व कार्यकर्ते त्याप्रमाणे शेतकरी वर्ग यांची सदाभाऊ खोत यांना पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये मंत्रीपद पाहण्याची इच्छा व उत्सुकता आहे याच पार्श्वभूमीवर रयत क्रांती संघटनेच्या महाराष्ट्र राज्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देवेंद्रजी फडणवीस,एकनाथजी शिंदे, अजित दादा पवार यांच्याकडे आदरणीय सदाभाऊंना मंत्रिमंडळात विस्तारामध्ये स्थान देण्याबाबत विनंती केली आहे व निश्चितपणे एका शेतकरी नेत्याला महाराष्ट्र राज्य सरकार मध्ये मंत्रीपदावर बसवून महायुतीचे सर्व माननीय नेते शेतकऱ्याच्या व रयत क्रांती संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भावनाचा आदर करतील हीच अपेक्षा असल्याचे रयत क्रांती संघटनेचे मंठा नामदेव मंडपे यांनी केली.

आ. प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या -तोफीक लाला

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय नेतृत्व आमदार प्रकाश सोळंके यांनी थेट आमदारकीची निवडणूक न लढवता जिल्हा परिषद पासून आपल्या राजकीय प्रवासाचा श्री गणेशा केला जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती,आमदार, राज्यमंत्री,साखर कारखान्याचे चेअरमन,राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष या विविध पदांवर त्यांनी कार्य केले आहे. व सध्या करत आहेत माजलगाव विधानसभा मतदार संघातील विकासाचा पाईक म्हणून ओळखले जाणारे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक महत्वपूर्ण कामगिरी बजावली असून त्यांच्या निष्काम सेवेमुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास झाला आहे.त्यामुळे त्यांना होणाऱ्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री पद देण्याची मागणी माजलगाव राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका उपाध्यक्ष तोफीक लाला यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे

आ.प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघात सिंचन, वीज, दळणवळण, शिक्षण आणि औद्योगिक विकासावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, गावोगावात वीज पुरवठा, माजलगाव शहराची राष्ट्रीय महामार्गाशी जोडणी आणि माजलगाव धारूर येथील औद्योगिक वसाहत त्यांच्या महत्वाच्या कामगिरीचे प्रमुख उदाहरण आहेत.या विकास कामांमुळे मतदार संघातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.माजी उपमुख्यमंत्री लोकनेते स्वर्गीय सुंदरराव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय कार्यात सक्रिय झालेले आ. प्रकाश सोळंके हे कोणत्याही प्रकारचा जातीय भेदाभाव न करता सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र घेऊन चालणारे समावेशक नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निष्काम सेवेमुळे ते पाच वेळा माजलगाव मतदार संघाचे आमदार झालेले असून त्यांची लोकप्रियता अफाट आहे.त्यामुळे आ.सोळंके यांचा गठीत होणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून पक्षश्रेष्ठींनी संधी द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका उपाध्यक्ष तोफीक लाला यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.

आ.प्रकाश सोळंकेंचा मंत्रिमंडळात समावेश करा -कृष्णा थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अभ्यासु, विकासाची जाण असलेले सर्वसामान्यांचे नेतृत्व आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी शुक्ल तिर्थ लीमगावचे सरपंच कृष्णा थावरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा विधानसभेत निवडून पाठवले असून त्यांना माजलगाव मतदार संघाच्या विकासाची जाण आहे तसेच बीड जिल्ह्यात विकासात्मक कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता म्हणून आ.प्रकाश सोळंके यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची

संधी पक्षश्रेष्ठीने देणे गरजेचे आहे. सोळंके घराणे या मतदारसंघात विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज आहेत आ.प्रकाश सोळंके यांचे वडील स्वर्गवासी लोकनेते सुंदरराव सोळंके या मतदारसंघात माजलगाव सारखे धरण बांधल्यामुळे आज या भागातील शेतकरी समृद्ध झाला आहे तसेच आमदार प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विविध विकासकामे केली त्यामध्ये माजलगाव शहर केंद्रीय महामार्ग ला जोडण्याचे महत्वाचे कार्य करून मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. एम.आय.डी.सी. उपजिल्हा रुग्णालय, स्त्रीरुग्णालय असे लोक उपयोगी अनेक प्रकल्प त्यांनी या मतदारसंघात राबवली आहेत. जलसिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघातील शेतकरी आज समृध्द झाला आहे.

ईव्हीएम मशिनला जबाबदार धरत विरोधकांचा राज्यात तमाशा-राम कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमताने जनादेश मिळाल्यानंतर यशाचे खापर विरोधकांनी ईव्हीएम मशिनवर नेहमीप्रमाणे फोडले असुन सद्यस्थितीत मविआ नेत्यांची सुरू असलेली आरडाओरड म्हणजे बिनपैशाचा तमाशा होय. आपला तो बबल्या, दुसर्याचं कार्ट ही निती विरोधकांची असुन विजयाला ईव्हीएम मशिनच जबाबदार असेल तर मग वायनाड लोकसभेत विजयी झालेल्या काँग्रेस नेत्या खा.प्रियंका गांधी यांचा विजय बोगस समाजावा का? असं म्हणत भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी फारच ईव्हीएम मशिनवर राग असेल तर प्रियांका गांधींचा राजीनामा मल्लिकार्जुन खरगे का घेत नाहीत? तर जितेंद्र आवाडांनीही स्वाभिमानाने राजीनामा द्यावा असं त्यांनी म्हटलं.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकताना राज्यात मागच्या अडीच वर्षात महायुतीच्या सरकारने केलेली अभुतपुर्व कामगिरी जनसामान्य जनतेच्या हिताचं काम आणि लाडक्या बहिणीसाठी सुरू केलेली योजना हेच खर्या अर्थाने यशामागचं कवित्व आहे. मविआच्या नेत्यांना आपण सत्तेत येवु याची खात्री का पटली होती? कारण मागच्या दोन अडीच वर्षात राज्यात सत्ताधार्यांची केवळ बदनामी केल्याशिवाय त्यांनी सकारात्मक राजकारण केलं नाही. वास्तविक पहाता विरोधकांच्या अपयशाचे धनी खा.संजय राऊत, नाना पटोले, जितेंद्र आवाड यांच्यासारखे वाचाळवीर असुन खरं आत्मपरीक्षण मविआच्या नेत्यांनी करायला हवं. राज्यातील सर्वसामान्य जनता मात्र महायुतीच्या अर्थात सत्ताधार्यांवर प्रचंड विश्वास टाकत खंबीरपणे पाठीमागे उभी राहिली आणि जनादेश अभुतपुर्व यशाने मिळवुन दिला. राजकारण सकारात्मक करायला हवं पण आम्हाला मिळालेला विजय विरोधकांना सहन होईना. वास्तविक पहाता राज्यातील जनतेने राहुल गांधी, शरदचंद्र पवार आणि उद्धव ठाकरे यांना त्यांची जागाच दाखवुन दिली असा जनादेश महायुतीला दिला. निकाल आल्यानंतर अपयशाचं आत्मपरीक्षण न करता ही मंडळी आता ईव्हीएमच्या नावाने नेहमीप्रमाणे बिनपैशाचा तमाशा करू लागली. त्यात मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह राज्यातील सर्व मविआच्या नेत्यांनी तमाशात घेतलेला सहभाग आश्चर्यकारक म्हणावा लागेल. आपला तो बबल्या, दुसर्याचं कारटं ही निती विरोधकांची नेहमीच राहिली. कर्नाटकासह अनेक राज्यात काँग्रेसला विजय मिळाला. तिथं ईव्हिएम मशिन चांगली वाटते. एवढंच नव्हे तर याच निवडणुकी दरम्यान वायनाड लोकसभा मतदारसंघात खा. प्रियंका गांधी प्रचंड मतांनी निवडुन आल्या. नांदेड लोकसभेची जागा काँग्रेसला मिळाली. एवढेच काय तर मविआला देखील बोटावर मोजता येतील एवढ्या विधानसभेच्या जागा मिळाल्या. त्यांचा विजय त्यांना ईव्हीएमवर मान्यच कसा होतो? राष्ट्रीय काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे मोठ्याने ओरडून ईव्हीएमच्या नावाने गळा काढु लागले. देशभरात आंदोलन उभा करण्याची घोषणा केली. प्रश्न हा पडतो मग वायनाडमधुन विजयी झालेल्या प्रियांका गांधी यांचा अगोदर राजीनामा काँग्रेसनं घ्यायला हवा. ज्यामुळे ईव्हीएम मशिन तुम्हाला मान्य नाही याची सिद्धता होईल. जितेंद्र आवाडसारखे पोपटपंची आता करू लागले त्यांनीही खरं तर राजीनामा आधी अगोदर द्यायला हवा. ईव्हीएमच्या नावाने विरोधकांची ओरड म्हणजे कुस्तीच्या मैदानात नुरा कुस्ती निकाली निघुन देखील पाट लागलीच नाही असं पराभुत होणार्या पहिलवानाकडून म्हणावी तशी ओरड विरोधक करताना दिसतात.

सुनील साखरे यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

येथील हिवताप निर्मूलन कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी सुनील साखरे यांची महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स फेडरेशनच्या मराठवाडा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सुनील साखरे महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन संघटनेचे राज्य उपाध्यक्ष असून राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हा माजी कार्याध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. आरोग्य कर्मचार्यांच्या प्रश्नांसाठी लढा उभारून हक्काच्या मागण्या शासनाकडून मंजूर करून घेतलेल्या आहेत. यामध्ये आरोग्य कर्मचार्यांचा पीटीए ३९५ होता त्यामध्ये वाढ करून १५०० रुपये मंजूर करुन घेण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक थुल, राष्ट्रीय सरचिटणीस एन.एल. श्रीधरन, राज्याध्यक्ष संदीप नागे, राज्य सरचिटणीस डी.डी. पाटील, राज्य कार्याध्यक्ष शालिक माऊलीकर, भास्कर गवाळे, विभागीय सचिव जगदीश गोपाळे यांनी महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स फेडरेशनच्या मराठवाडा अध्यक्षपदी सुनील साखरे यांची नियुक्ती केली आहे.सुनील साखरे यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून कोषागार संघटनेचे राज्य अध्यक्ष बालाजी परदेशी, राजकुमार कदम, तांदळे, राजेश धुताडमल, शिंदे, बागलाने, नितीन म्हवाले यांच्यासह पेन्शनर्स फेडरेशनचे बीड जिल्हा पदाधिकारी आणि सदस्यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कार विजेती, दूध उत्पादक शेतकरी महिलेची वार्षिक कमाई ३ कोटीची

हरियाणाच्या प्रगतीशील डेअरी शेतकरी रेणू सांगवान यांना तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल २६ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय दूध दिनानिमित्त राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कारने सन्मानित करण्यात आले आहे. साहिवाल, गिर, राठी, थारपारकर आणि हरियाणा जातीच्या गायी पालानातून त्यांची वार्षिक उलाढाल ३ कोटींहून अधिक आहे. हरियाणातील झज्जर जिल्ह्यातील खरमान गावातील रहिवासी असलेल्या प्रगतीशील दुग्ध उत्पादक रेणू संगवान यांनी आपल्या कठोर परिश्रम, समर्पण आणि समर्पणाने केवळ स्वत:लाच स्वावलंबी बनवले नाही तर हजारो शेतकरी आणि महिलांसाठी ते प्रेरणास्थान बनले आहे. दुग्धव्यवसायात त्यांनी अवलंबलेले नाविन्य आणि कठोर परिश्रम यामुळे त्यांना देशभरात ओळख मिळाली आहे. आज त्यांचे नाव शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी उदाहरण बनले आहे.

अशी केली सुरूवात : २०१७ मध्ये रेणू सांगवान यांनी त्यांचा डेअरी फार्मिंगचा प्रवास सुरू केला. सुरुवातीच्या काळात त्यांच्याकडे फक्त ९ देशी गायी होत्या, पण आता त्यांच्या शेतात २८० हून अधिक गायी आहेत. त्यांच्या फार्मचे नाव गोकुळ फार्म श्री कृष्ण गोधाम आहे, ज्याकडे संपूर्ण देशात एक आदर्श डेअरी फार्म म्हणून पाहिले जाते. साहिवाल, गिर, राठी, थारपारकर आणि हरियाणा या देशी गायींवर ते अवलंबून होते. या गायींचे दूध आरोग्यदायी तर असतेच, पण संकरित जातींच्या तुलनेत त्यांची काळजी घेण्याचा खर्चही कमी असतो. त्यांनी गायींसाठी मुक्त गोठा पद्धतीने नैसर्गिक वातावरण तयार केले, ज्यामध्ये गाई मोकळ्या कुरणात फिरतात आणि हिरवा चारा खातात.दुग्धजन्य पदार्थांची जागतिक बाजारपेठ : रेणू सांगवान यांनी त्यांच्या दुग्धव्यवसाय केवळ दूध उत्पादनापुरता मर्यादित ठेवला नाही तर तूप, पनीर, बर्फी आणि च्यवनप्राश यांसारखे दुग्धजन्य पदार्थ बाजारात आणले. सध्या त्यांच्या डेयरीत निर्मित तुपाला भारतातच नाही तर २४ हून अधिक देशांमध्ये मागणी आहे. त्यांचे तूप आणि इतर उत्पादने त्यांच्या उच्च गुणवत्तेसाठी प्रसिद्ध आहेत. २०२३-२४ मध्ये त्यांच्या शेतीची उलाढाल ३ कोटी रुपयांवर पोहोचली. हे रेणू सांगवान यांच्या दूरदृष्टीचे आणि मेहनतीचे फळ आहे.

डेअरी फार्मिंगसाठी तांत्रिक नवकल्पना :रेणू सांगवान आणि त्यांचा मुलगा डॉ. विनय सांगवान यांनी त्यांच्या डेयरीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. डॉ.विनय सांगवान यांनी सांगितले की, त्यांनी गायींसाठी स्वयंचलित दूध काढण्याचे यंत्र आणि स्वच्छतेसाठी आधुनिक उपकरणे वापरली आहेत. देसी बैलाचे वीर्यही त्यांच्या शेतात तयार करून विकले जाते. जाती सुधारणा कार्यक्रमांसाठी हे खूप महत्वाचे आहे.दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना सूचना :दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी काही महत्वाच्या सूचना रेणू सांगवान देतात त्या म्हणजे. संकरित जातींऐवजी देशी गायींना प्राधान्य द्या, गायींचे नियमित लसीकरण करा आणि त्यांच्या खाण्यापिण्याच्या स्वच्छतेची काळजी घ्या, गाईंना संतुलित आणि हिरवा चारा असलेला आहार द्या. व्यवसाय कमी गायींपासून सुरुवात करा आणि जसजसे तुम्हाला अनुभव मिळेल तसतसे ते वाढवा. गायींची काळजी घेण्यासाठी नैसर्गिक पद्धतींचा अवलंब करा, ज्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.भविष्यातील योजना :रेणू सांगवान आणि डॉ. विनय सांगवान यांचे स्वप्न आहे की देशातील प्रत्येक शेतकऱ्याने देशी गायी पाळल्या पाहिजेत आणि त्यांच्या संगोपनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. शेतकऱ्यांनी दुधाचे उत्पादन तसेच इतर संबंधित उत्पादने बाजारात आणावीत, जेणेकरून त्यांचे उत्पन्न वाढू शकेल.

मक्याच्या संकरीत जाती देतात हेक्टरी १०० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन!

भारतीय कृषी संशोधन संस्थेने मक्याच्या अशा दोन जाती विकसित केल्या आहेत ज्या बंपर उत्पादन देतात, आणि शेतकऱ्यांना यातून चांगले उत्पन्न मिळेल. अलीकडच्या काळात, सीव्हीआरसी (केंद्रीय विविधता प्रकाशन समिती) मार्फत आयाआयएमआर कडून मक्याच्या २५ सिंगल क्रॉस हायब्रीड विकसित आणि प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. मक्याचे हे नवीन वाण आहे डीएमआरएच १३०८ आणि डीएमआरएच १३०१. मक्याच्या या जातींनी राष्ट्रीय स्तरावर उत्पादकता वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.आयआयएमआर इथेनॉल उत्पादन वाढवण्यासाठी मका उत्पादन वाढविणाऱ्या प्रकल्पावर काम करत आहे. शेतकऱ्यांनी जास्त उत्पादन देणाऱ्या मक्याच्या वाणांची लागवड करावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मक्याच्या माध्यमातून शेतकरी ऊर्जा उत्पादक बनले पाहिजे.

संकरित मक्याचे वाण : डीएमआरएच १३०८ - रब्बी हंगामात लागवडीसाठी संकरित डीएमआरएच १३०८ ची शिफारस करण्यात आली आहे. १३०-१५० दिवसांत पक्व होणारा हा उच्च उत्पन्न देणारा रब्बी संकरित मका आहे, ज्यामध्ये दाण्यांचा रंग आकर्षक पिवळा आहे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक आहे. गेल्या चार वर्षात, १३०८ मक्याच्या वाणाने मोठा वाटा उचलला आहे.

डीएमआरएच १३०१ - ही जात पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमध्ये रब्बी हंगामाच्या लागवडीसाठी शिफारस करण्यात आली होती. हा आणखी एक मध्यम कालावधीचा संकरित मका आहे. आकर्षक पिवळे दाणे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक असलेली ही उच्च उत्पन्न देणारी जात आहे. हा संकरीत वाण शेतकऱ्यांना ६.५ ते १०.५ टन/हेक्टर उत्पादन देते. म्हणजेच, योग्य व्यवस्थापन केल्यास या जातीपासूनही १०० क्विंटल प्रति हेक्टरपेक्षा जास्त उत्पादन मिळू शकते.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ड्रॅगन फ्रूट शेतीसाठी सरकार देतेय अनुदान

पुणे : अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी या संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी ऑनलाईन पद्धतीनं अर्ज करायचे आहेत.एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमा अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली आहे. सदर योजनेअंतर्गत ड्रॅगन फ्रुट, सुट्टी फुले, मसाला पिके, फळबागा पुनरुज्जीवन, सामुहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरीण, शेडनेट हाऊस, हरितगृह, प्लास्टिक मल्चिंग, डाळिंब पिकासाठी कव्हर, मधुमक्षिका वसाहत आणि मधुमक्षिका संच, ट्रॅक्टर २० एचपी पर्यंत, पॉवर टिलर ८ एचपी पेक्षा जास्त आणि कमी, पिक संरक्षण उपकरणे यासाठी अनुदान मिळणार आहे. यासोबतच या योजनेत पॅक हाऊस, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, रेफरव्हॅन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी, कांदाचाळ, स्थायी फिरते विक्री केंद्र शीत चेंबरच्या सुविधेसह, द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर इत्यादी घटकांचा देखील समावेश आहे. या घटकांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावे स्वतःची शेत जमीन असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याकडे फलोत्पादन पिके असणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

कोल्हापूरातील लांबलचक ऊसाची राज्यात चर्चा; बघ्यांची उसळली भाऊगर्दी

कोल्हापूर : योग्य नियोजन अन् वेळच्या वेळी मशागत केली, तर मुरमाड शेत जमिनीत उसाचे विक्रमी उत्पादन घेता येते, हे कोल्हापूरातील लाटवडे गावच्या उद्योजक शंकर पाटील यांनी सिद्ध करून दाखविले आहे. पेठवडगाव येथे पाटील यांची शेती आहे. त्यांच्या शेतातील लांबलचक उसाची सध्या राज्यभर चर्चा होत आहे. ही ऊस शेती पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी मोठी गर्दी करू लागले आहेत.

पारंपरिक पद्धतीने करीत असलेल्या शेतीला फाटा देत त्यांनी आधुनिक पद्धतीने ऊस शेती करून विक्रमी उत्पादन घेण्याचा निर्धार करून उसाची लागवड केली. जुलैमध्ये ८६०३२ या जातीची बीज प्रक्रिया करून दोन डोळ्यांच्या कांडीची साडेचार फूट सरी सोडून त्यांनी लावण केली. मुरमाड शेत जमिनीत उगवण ही उत्तम झाली. अन् तब्बल ५० ते ५५ पेरी असणारा लांबलचक वजनदार ऊस सोळा महिन्यात तयार झाला. पाटील यांना गुंठ्याला तीन टन उत्पादन घेण्यात यश आले आहे. जाड पेरी असलेला लांबलचक वजनदार ऊस तीन ते चार ठिकाणी तोडूनच त्याची मोळी बांधावी लागत आहे. एकसारखा तीन एकरातील हा ऊस तब्बल ३६० टन उत्पादन देणारा ठरणार आहे. यासाठी त्यांना ऊस शेतीतज्ज्ञ सचिन पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे. पाटील यांच्या तीन एकर शेतात हा ५० ते ५५ पेरांचा लांबलचक ऊस वाढला आहे. उसाची शेती परवडत नाही अशी तक्रार त्यांनी विक्रमी उत्पादन घेऊन फोल ठरविली. शेतीचे योग्य त्या पद्धतीने व्यवस्थापन केले की भरघोस उत्पादन मिळते अन् आर्थिक फायद्याचा गोडवा ही चाखता येतो हे शंकर पाटील यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

शेळ्या सारख्या आजारी पडत असल्यास या झाडांची पाने खाऊ घाला

बहुतेक वेळा तुमच्या बघण्यात आले असेल की शेळ्या बाहेर चरायला गेल्यावर काही विशिष्ट झाडांचा किंवा वनस्पतीचा पाला खातात. शेळ्या आजारी पडल्या तर ते स्वतःला बरे करण्यासाठी झाडे किंवा वनस्पतींची पाने खातात. परंतु सध्या बहुतेक शेळीपालक शेळ्यांना बाहेर चरायला नेत नाही किंवा त्यांना शेळीपालन व्यवसायासाठी पुरेशी जागा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी अशा उपयुक्त झाडाची पाने द्यावीत. मोरिंगा, कडुनिंब, जामुन, बाईल आणि पेरूची पाने दिल्यास शेळ्यांना जास्त फायदा होईल. ही पाने शेळ्यांना अनेक रोगांपासून दूर ठेवतील.

हिरवा चारा हा दुभत्या जनावरांसाठी जीवनरक्षकापेक्षा कमी नाही. गाई, म्हशींबरोबरच शेळ्यांसाठीही हिरवे गवत आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. कारण त्यात अनेक औषधी औषधांचे गुणधर्म आढळतात. हे खाल्ल्यानंतर जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढते. परंतु शेळ्यांसाठी गवतापेक्षा झाडांची पाने आणि वनस्पती अधिक फायदेशीर आहेत. पानांमध्ये असे घटक आणि औषधी गुणधर्म आढळतात, जे सेवन केल्याने शेळ्यांचे अनेक रोग आपोआप बरे होतात. कारण झाडांची पाने शेळ्यांसाठी औषध म्हणून काम करतात.पानांमध्ये टॅनिनचे प्रमाण आणि प्रथिने : वास्तविक, मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने, कडुनिंब, जामुन, आणि पेरूच्या पानांमध्ये मुबलक प्रमाणात टॅनिन सामग्री आणि प्रथिने आढळतात, जे शेळ्यांसाठी खूप उपयुक्त आहेत. त्यांची पाने खाल्ल्याने शेळ्यांच्या पोटात जंत होत नाहीत. त्यामुळे शेळ्यांची वाढ झपाट्याने होते. त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. शेळ्यांच्या पोटात जंत आल्यावर अनेक प्रकारचे आजार आपोआप उद्भवतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होते : कडुनिंब, पेरू, जामुन, मोरिंगा ही झाडे तुम्हाला सर्वत्र सहजासहजी दिसणार नाहीत. तरीही तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. सीआयआरजी अशा पानांपासून बनवलेले औषध बाजारात विकत आहे. ते खाल्ल्यानंतर फायदा होईल. त्याचबरोबर शेळीच्या करडांना कडुनिंबाची पाने खाऊ घातल्यास त्यांच्या शरीरातील रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. हे खाल्ल्याने शेळीची करडे सहजासहजी आजारी पडत नाहीत. त्याचबरोबर शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते. शेळीपालनातही सर्वाधिक नुकसान शेळ्यांच्या मृत्यूमुळे होते ते यातून टाळता येईल.

दिन विशेष

जागतिक दिवस: जागतिक एड्स दिवस

महत्वाच्या घटना

- १६४० : २० वर्षापासून स्पेनचे गुलाम असलेल्या पोतुर्गालला स्वतंत्र मिळाले होते.
- १८३५ : हान्स क्रिस्चीयन अँडरसन च्या परीकथांचे पहिले पुस्तक प्रकाशित.
- १९१७ : कोल्हापूरमधील पॅलेस थिएटरमधे श्रीपतराव काकडे, दामलेमामा, फत्तेलाल, बाबा गजबर, ज्ञानबा मेस्त्री, पंत धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत बाबूराव पेंटर यांनी 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'ची स्थापना केली.
- १९३० : याच दिवशी कोलकत्ता आणि ढाका मध्ये विमानसेवा सुरु झाली होती.
- १९४८ : एस. एस. आपटे यांनी 'हिन्दुस्तान समाचार' ही बहुभाषिक वृत्तसंस्था स्थापन केली.
- १९६३ : नागालँड भारताचे १६ वे राज्य बनले.
- १९६४ : मालावी, माल्टा आणि झांबियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
- १९६५ : भारताच्या सीमांच्या संरक्षणासाठी सीमा सुरक्षा दलाची स्थापना
- १९७३ : पापुआ न्यू गिनीला (ऑस्ट्रेलियाकडून) स्वातंत्र्य मिळाले.
- १९७६ : अंगोलाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
- १९८१ : विषाणूची प्रथमच ओळख पटली.
- १९८८ : जागतिक एड्स दिन.
- १९८८ : बेनझीर भूट्टो यांची पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी नेमणूक झाली.
- १९९१ : एड्स जागरुकतादिवसाची सुरुवात झाली होती.
- १९९२ : कलाक्षेत्रात केलेल्या प्रदीर्घ व अविस्मरणीय कामगिरीबद्दल गदिमा प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा 'गदिमा पुरस्कार' गायिका आशा भोसले यांना जाहीर
- १९९२ : ज्यूडी लेदेन या ब्रिटिश महिलेने ३९७० मीटर (१३०२५ फूट) उंचीवरुन हँग ग्लायडर चालवून उंचीचा नवीन उच्चांक प्रस्थापित केला.
- १९९३ : प्राच्यविद्या विशारद डॉ. रा. ना. दांडेकर, वेदविद्या पारंगत डॉ. चिं. ग. काशिकर आणि प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे सन्माननीय 'डी. लिट. पदवी' जाहीर
- १९९९ : भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान (कै.) इंदिरा गांधी यांना 'वूमन ऑफ द मिलेनियम' म्हणून मानांकित करण्यात आले.
- २००० : नागालँड येथे दरवर्षी १ ते ७ डिसेंबर दरम्यान होर्निबल महोत्सव साजरा करण्याची सुरवात झाली.
- २००१ : ट्रान्स वर्ल्ड एअरलाइन्सचे शेवटचे उड्डाण. यानंतर ही कंपनी अमेरिकन एअरलाइन्समधे विलीन झाली.
- २००८ : माजी लोकसभा अध्यक्ष शिवचरण झा यांचे निधन.
- २०१५ : ज्येष्ठ पत्रकार डॉ. मुझफ्फर हुसैन यांना लोकमान्य टिळक जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १०८१ : लुई (सहावा) - फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ ऑगस्ट ११३७)
- १७६१ : मेरी तूसाँ - 'मॅडम तूसाँ वॅक्स म्युझियम'च्या संस्थापिका (मृत्यू: १६ एप्रिल १८५०)
- १८७८ : भारतासाठी आपले जीवन अर्पण करणारे विदेशी वंशाचे जॉर्ज अरुंडेल ला जन्म.
- १८८५ : आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण तथा 'काकासाहेब' कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, इतिहासकार, बहुभाषा कोविद, रसिक, सखोल चिंतक, गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू (१९२८), राज्यसभा सदस्य (१९५२ १९५८), अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष (१९५३),
- १८८६ : भारताचे प्रसिद्ध पत्रकार आणि समाजसेवक महेंद्र प्रताप यांचा ला जन्म.
- १९०९ : बा. सी. मर्ढेकर मराठी नवकाव्याचे प्रणेते (मृत्यू: २० मार्च १९५६)
- १९११ : पत्रकार, कथाकार, कवी आणि समीक्षक अनंत बाळकृष्ण अंतरकर यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑक्टोबर १९६६)
- १९२४ : परमवीर चक्राने सन्मानित भारतीय सेनेतील शैतान सिंग यांचा साली जन्म.
- १९५० : भारतीय जीवशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक मंजू बन्सल यांचा जन्म.
- १९५४ : प्रसिद्ध समाज सेविका मेधा पाटकर यांचा ला जन्म.
- १९५४ : भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेते राकेश बेदी यांचा ला जन्म.
- १९५५ : उदित नारायण - पार्श्वगायक १९११ अनंत अंतरकर 'हंस', 'मोहिनी', 'नवल' आणि 'सत्यकथा' या मासिकांचे संपादक (मृत्यू: ४ आक्टोबर १९६६)
- १९६३ : अर्जुना रणतुंगा - श्रीलंकेचा क्रिकेटपटू व व्यवस्थापक
- १९८० : मोहम्मद कैफ - भारतीय क्रिकेटपटू
- १९६० : भारतीय-इंग्रजी राजकीय शास्त्रज्ञ आणि शैक्षणिक शिरिन एम. राय यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १८६६ : भारताचे सर्वेक्षण करणारे कर्नल सर जॉर्ज एव्हरेस्ट (जन्म: ४ जुलै १७९०)
- १८८६ : इस्त्राईल चे पहिले पंतप्रधान डेव्हिड बेन-गुरियन यांचे निधन.
- ११३५ : हेन्री (पहिला) - इंग्लंडचा राजा (जन्म: १०६८)
- १९७४ : उत्तरप्रदेश च्या माजी मुख्यमंत्री सुचेता कृपलानी यांचे निधन.
- १९८५ : शंकर त्रिंबक तथा 'दादा' धर्माधिकारी स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक (जन्म: १८ जून १८९९)
- १९८८ : गंगाधर बाळकृष्ण तथा 'गं. बा.' सरदार विचारवंत व साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे भाष्यकार, दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९७८), बार्शी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९८०) (जन्म: २ आक्टोबर १९०८)
- १९९० : विजयालक्ष्मी पंडीत - राजदूत, मुत्सद्दी व राजकारणी (जन्म: १८ ऑगस्ट १९००)
- २०१५ : युनायटेड स्टेट चे प्रसिद्ध बास्केटबॉल खेळाडू जिम लॉस्कुटॉफ यांचे निधन.

लिंबागणेश उपकेंद्रातील अनागोंदी कारभारामुळे विजेअभावी रब्बी पिके धोक्यात

महावितरणच्या विरोधात गुरूवारी रास्तारोको

लिंबागणेश

बीड तालुक्यातील लिंबागणेश आणि पंचक्रोशीतील गावांमधील विजेच्या समस्येने तिव्र रुप धारण केले असुन दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने मुबलक पाणी उपलब्ध असुनही वीजे अभावी शेताला पाणी देता येत नसल्याने रब्बी हंगामातील कांदा ज्वारी,गहु, हरभरा आदी पिके वाळु लागल्याने शेतकऱ्यांना हातची पिके वाया जाण्याची धास्ती असुन लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त असुन लाईनमन वेळेवर ड्युटी करत नसल्याने तसेच मुख्यालयी रहात नसल्याने रात्री अपरात्री ग्रामस्थांना फ्युज टाकणे,केबल बदलणे आदी कामे करावी लागत असुन महावितरणच्या अनागोंदी कारभार विरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.५ डिसेंबर गुरूवार रोजी अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन कार्यकारी अभियंता महावितरण बीड यांना दिले आहे. निवेदनावर सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे,विक्की वाणी, हरिओम क्षीरसागर,अक्षय वाणी, महादेव कुदळे,जनार्धन वाणी, सय्यद बशीर, राजेंद्र ढास, श्रीकांत शिंदे, शिवाजी ढास, नानासाहेब वायभट, संतोष भोसले, संजय पावले आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लिंबागणेश आणि पोखरी (घाट) गावाला भायाळा साठवण तलावातुन पाणीपुरवठा होत आहे.मात्र कमी दाबाचा वीजपुरवठा विद्युत मोटारी सुरळीत चालत नाहीत. त्यामुळे गावाचा पाणीपुरवठा १५ दिवसांपासून बंद असुन पाण्यावाचुन ग्रामस्थांचे हाल होत आहेत. पोखरी (घाट) येथुन पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र फीडरची व्यवस्था करण्यात यावी. लिंबागणेश येथील उपकेंद्रातील उप अभियंता पद अडीच महिन्यांपासून रिक्त असुन दिवसा कार्यालयात लाईनमन हजर नसतात.विजे संदर्भात फोन केला तर घेत नाहीत टाळाटाळ करतात. मुख्यालयी लाईनमन रहात नसल्याने रात्री अपरात्री फ्युज टाकणे आदी कामे ग्रामस्थांनाच जीव मुठीत धरून करावी लागतात.कारण गावठाण रोहित्रांची दुरावस्था असुन जळालेले केबल,उघडे वायर, झाडांच्या फांद्यामधुन गेलेल्या विजेच्या तारा सगळंच धोकादायक असुन एखादी दुर्दैवी घटना घडल्यास महावितरण कार्यालय जबाबदारी घेणार काय?? असा संतप्त सवाल ग्रामस्थ हरिओम क्षीरसागर यांनी केला आहे.

बिबट्याच्या शोधात वन विभागाची नाईट पेट्रोलिंग सुरु

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात सर्वाधीक ऊसाचे क्षेत्र आसलेल्या ग्रिन बेल्टमध्ये बिबट्याने चांगलाच धुमाकुळ घातला आहे.वन विभागाने बिबट्याला जेरबंध करण्यासाठी बिबट्या दिसला होता त्या गावच्या शिवारात नाईट पेट्रोलिंग सुरु केली आहे. तरी सुद्धा बिबट्याचा थांगपत्ता लागेना आणि शेतकरी, शेतमजुर भयमुक्त होईना आशी स्थिती निर्माण झाली आहे.

शहरानजीक असलेल्या बुट्टेनाथ परिसर बिबट्याचा धुमाकुळ बंध होताच गेली चार दिवसापासुन पुस,जवळगाव,ममदापूर, पाटोदा, माकेगाव, कोळकानडी परीसता धुमाकुळ घालत जनावराचा फडशा पाडला आहे.सध्या ग्रिन बेल्ट शिवारात ऊसतोडणी जोरात सुरू आहे. त्यामुळे ऊस तोड मजुर ऊसाच्या फडानजीक पाल ठोकून आपल्या मुलाबाळासह राहात आहेत. बिबट्याचे दर्शन झाल्याने ऊस तोडणीसाठी आलेले ऊस कामगार व शेतकरी भयभीत झाले आहेत.बिबट्या कधी कोठून येईल या भितीमुळे शेतकऱ्यांची ऊस तोडणी खोळंबली आसुन शेतकरी शेतात जाण्याचे टाळत आहेत.अंबाजोगाईच्या वनविभागाच्या अधिकारी विजया शेंगोटे आपल्या टिमसह त्या परीसरात थळ ठोकून आहेत. स्वतःच्या स्वरक्षणासाठी शेतात जाताना कुऱ्हाड, विळा,गोफन, कोयता, काठ्या या वस्तुंचा वापर करण्याचे अवाहान शेतकऱ्याना करत आहेत तरीसुद्धा शेतकरी शेतात जाण्याची हिम्मत करत नसल्याचे पाहीला मिळत आहे.वन विभाग बिबट्याला जेरबंध करण्यासाठी त्या परीसरात थळ ठोकून आहेत.बिबट्याच्या शोधात ममदापूर, पाटोद,कोळकानडी, राडी परिसरात वन विभागाने नाईट पेट्रोलिंग सुरु केली आहे.तरी सुद्धा बिबट्याचा थांगपत्ता लागत नसल्याने वनविभाग हातबल तर शेतकरी,शेतमजुर भयभीत झाले आहेत. जोपर्यंत बिबट्याचा थांगपत्ता लागत नाही तोपर्यंत त्या परीसरातील शेतकरी, शेतमजुर,नागरीक भयमुक्त होणार नाहीत. त्यामुळे बिबट्या कधी जेरबंध होईल याकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

थोडक्यात

वसुंधरा महाविद्यालयात रक्त तपासणी शिबिर

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथील वसुंधरा महाविद्यालयामध्ये साई क्लीनिकल लॅबोरेटरीज घाटनांदुर वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर यांच्या सौजन्याने राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्राणीशास्त्र विभाग यांच्या वतीने आरोग्यम रक्त तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष, मा बालासाहेब काका देशमुख, तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रभारी प्राचार्य, डॉ.अर्जुन मोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ मकरंद जोगदंड, डॉ.संजय खाडप प्राणीशास्त्र विभागातील प्रा. प्रणिता लंगडे, श्री साई श्रद्धा क्लीनिकल लॅबोरेटरीजचे श्री. वैजनाथ कोठुळे, श्री मुन्ना जोगदंड यावेळी मंचावर उपस्थित होते. हे आरोग्यम रक्त तपासणी शिबिर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आले होते.यावेळी प्रत्येकासाठी एकूण ११० रक्त चाचण्या या शिबिरातून आल्या. या शिबिरामध्ये एकूण २४ जणांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ मकरंद जोगदंड यांनी तर सूत्रसंचालन प्रा.अनंत कांबळे वं कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.संजय खाडप यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

सुगाव येथे हजरत टिपु सुलतान जयंती साजरी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

तालुक्यातील सुगाव येथे २७ नोव्हेंबर रोजी हाजरत टिपु सुलतान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी ढोलताश्याच्या गजरात गावात मिरवनुक काढनण्यात आली.या प्रसंगी टिपु सुलतान ग्रुपचे अध्यक्ष मुजम्मिल पठाण, उपाध्यक्ष अल्ताफ पटेल रियाज पटेल सादेक पटेल यांनी हाजरत टिपु सुलतान यांच्या विषयी माहिती दिली.यावेळी आझाद पटेल, साबेर पठान, शादुल्ला शेख, असलम पटेल,संतोष चव्हाण, अमन पटेल, रिहान पटेल,अरबाज पटेल,बहुसंख्य हिंदू, मुस्लीम ग्रामस्थांची उपस्थिती होती. बर्दापूर ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात दि.२ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी काही अडचणी असल्यास बैठकीस उपस्थित रहावे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीस समितीवर नियुक्त शासकीय सदस्य व अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या ग्राहक हितासंबंधी तक्रारी असल्यास बैठकीच्या दिवशी उपस्थित राहून लेखी स्वरुपात मुद्दा मांडण्यात यावा. असे आवाहन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य सचिव, तथा जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

जागतिक एड्स दिनानिमित्त रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे –डॉ.राजेंद्र पाटील

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा रुग्णालय जालना येथे जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रॅलीची सुरवात जिल्हा रुग्णालय जालना येथून होऊन मार्ग सतकर कॉम्प्लेक्स, शनी मंदिर मार्गे होवून गांधी चमन येथे समारोप होईल. रॅलीमध्ये विद्यार्थी – विद्यार्थीनींनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकित्सक, यांनी आव्हान केले आहे.एड्स/एचआयव्हीविषयी जनजागृती उपक्रमाचा सकारात्मक उद्देशाचे फलित, मुख्यत: अतिजोखमीच्या गटात पोहचून त्यांची तपासणी करुन एचआयव्ही पॉझिटीव्ह रुग्ण शोधणे हा आहे हा दृष्टीकोन ठेवून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथकाकडून जागतिक एडस दिनानिमित्त जिल्हाभरात दि. २ ते ९ डिसेंबर २०२४ या कालावधीत चित्रकला, रांगोळी स्पर्धा, सोशल मीडिया पोस्ट मेकींग स्पर्धा, डिजीटल पोस्टर, एड्सच्या माहितीपर व्याख्याने, जनजागृतीपर कार्यशाळा अशा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. असेही कळविले आहे.

आ.सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करा–जीलानी शेख

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस हे सर्वसामान्य जनतेचे आमदार असून गेली दहा वर्ष आमदार नसताना देखील गोरगरीब जनतेचे कामे केलेली आहेत, पाटोदा आष्टी शिरूर नगरपंचायत अंतर्गत घरकुल योजना अत्यंत उत्कृष्ट पणे राबवण्यात आलेली आहे गोरगरिबांच्या घराचे स्वप्न आमदार सुरेश आण्णा धस यांच्यामुळे पूर्ण झाली आहेत,

आमदार सुरेश आण्णा धस हे सर्वसामान्य घटकापर्यंत पोहोचणारे नेते

असून आमदार बच्चुभाऊ कडू यांच्यासारखे ते आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील दिव्यांग बांधवांचे आधार व साथ देणारे नेते आहेत विधानसभा निवडणुकीत इतर कोणत्याही उमेदवाराने दिव्यांग घटकाला विचारात घेतले नाही परंतु आ.सुरेश आण्णा धस यांनी दिव्यांग व्यक्तीसोबत बैठक घेऊन चर्चा करून त्यांना देखील विचारात घेतले हे या मतदारसंघात मतदार संघात प्रथमच घडले होते त्यामुळे मतदार संघातील सर्व दिव्यांग बांधवांनी एक संघ आमदार सुरेश आण्णा धस यांना साथ दिली. आशा लोकप्रिय बहुजन नायक आमदार सुरेश आण्णा धस यांना कॅबिनेट मंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करण्यात यावे अशी मागणी प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र चे अध्यक्ष जिलानी शेख सचिव वैभव देशमुख यांनी केली आहे

डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेवर सदस्य म्हणून संधी द्या – विनोद हातागळे

बीड। प्रतिनिधी

विधान सभा निवडणूक २०२४ मध्ये बीड विधानसभा मतदारसंघ २३० मधुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व महायुतीचे उमेदवार डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचा निसटता पराभव झालेला असून हा आमच्यासाठी कार्यकर्ता म्हणून वर्मी घाव लागलेला आहे. डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांनी आमच्या सारख्या विविध सामाजिक संघटनाना बळ देवून सामाजिक सलोखा अबाधीत राखण्याचे अमुल्य कार्य केले आहे. ते पुढे निरंतर सुरु ठेवण्यासाठी डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचे व्यक्तिमत्व, सर्वागिण विकासाचा दुरदृष्टिकोन, पक्ष बांधणी, पक्ष निष्ठा, या बाबी लक्षात घेवुन त्यांना विधान परिषदेवर सदस्य म्हणून संधी द्यावी. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी जनतेने मोठा कौल दिला आहे. बीड विधानसभेत जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर हे तत्पर असून त्यांनी मागील काही वर्षात महायुतीच्या काळात विविध विकासकामे करून जनतेच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले याची पावती म्हणून महायुतीकडून डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांना विधानसभेची उमेदवारी दिली गेली मात्र या निवडणुकीत डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचा निसटता पराभव झाला आहे. बीड विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी विधान परिषदेची संधी देऊन बीडच्या जनतेच्या मनातील खरा आमदार म्हणून संधी द्यावी अशी मागणी आर्या सामाजिक प्रतिष्ठान बीड जिल्हा संस्थापक अध्यक्ष विनोद हातागळे यांनी केली आहे

शालेय साहित्य वाटप करून ज्योतिबा फुले यांना विनम्र अभिवादन

बीड। प्रतिनिधी

मानवामध्ये स्पृश्य, अस्पृश्य उच्च–नीचतेतून व अनिष्ट रुढी परंपरेमुळे हजारो वर्षा शिक्षणा पासून वंचित असलेल्या बहुजन समाज व स्त्रियांना शिक्षणाची दारे आपल्या कृतीतून मुलींची पहिली शाळा उघडून शिक्षणाची दारी उघडणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले १९ व्या शतकातील थोर क्रांतिकारक व समाज सुधारक होऊन गेले असे प्रतिपादन सहाय्यक उपनिबंधक सहकार खाते हनुमंत कांबळे यांनी केले. महामानव अभिवादन ग्रुप तर्फे आयोध्या नगर व रमाई नगर परिसरातील १४१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून महात्मा ज्योतिबा फुलेंना विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अवसरमोल ए.एल. तर प्रमुख पाहुणे म्हणून महामानवा अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, प्रशांत वासनीक, एड. तेजस वडमारे लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.जि . वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. ह्या प्रसंगी मंचावर कॅप्टन राजाभाऊ आठवले, श्याम वीर, आर.डी. यांची प्रमुख उपस्थिती होती. दुसरे प्रमुख पाहुणे प्रशांत वाचनिक यांनी विद्यार्थी व पालकाशी संवाद साधताना महात्मा ज्योतिबा फुले यांनी अविधेमुळे सर्व सर्वां रसा तळाला गेले कसे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. शिक्षण म्हणजे सत्य जाणणे व विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगून अंधश्रद्धे पासून दूर राहणे हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून महापुरुषांच्या जयंती, स्मृतिदिनी त्यांच्या विचारावर चालण्याचा दृढ निश्चय करून प्रयत्नाची पराकाष्टा करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सीनियर के.जी. मधील आदिरा वडमारे या बालिकेने पाच ओळी संविधाना बद्दल इंग्रजीतून सुस्पष्टपणे भाषण केली त्याबद्दल तिचा वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे रोख रक्कम देऊन सत्कार केला. कार्यक्रमास अनिल वीर,प्रकाश खंडारे, रोहन खंडारे, संगीता खंडारे, मोतीराम मस्के, नागसेन मस्के, गुलाबराव बिक्कड गोदावरी पटेकर, रत्नमाला चक्रे, राधाबाई वीर, अनिल वीर, बाईजाबाई वीर, ज्योती शिरसाठ व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

युवकांनी नवनवीन उद्योगात उतरावे–राजेंद्र मस्के

बीड। प्रतिनिधी

वाढती बेकारी आणि नोकऱ्यांचा तुटवडा लक्षात घेता तरुणांनी व्यवसाय उद्योगाकडे वळावे. गरज ही शोधाची जननी असून युवकांनी आपल्या परिसरात जनतेला आवश्यक असणाऱ्या विविध गरजांचा अभ्यास करून नव नवीन उद्योगात उतरून स्वावलंबी झाले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे नेते, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मोहिनिनाथ अर्थमुहर्स शुभारंभ प्रसंगी व्यक्त करून, उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व विलास काकडे यांना शुभेच्छा दिल्या.

बोरफडी गावचे उपसरपंच लालासाहेब पन्हाळे व जरुड येथील युवा कार्यकर्ते विलास काकडे यांनी जेसीबी (पोकलेन) मशीनच्या माध्यमातून नवीन व्यवसायाला सुरवात केली. आज जरुड फाटा येथे मोहिनिनाथ अर्थमुहर्सचा शुभारंभ गोरक्षनाथ

टेकडीचे महंत नवनाथ बाबा महाराज, भवानीगड संस्थानचे महंत अखंडानंद गिरी महाराज, जरुड संस्थानचे महंत नवनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व शेतकरी मित्र राजेंद्रजी मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी धनंजय गुंदेकर, पोपटराव शेंडगे, विजय सुपेकर, सुनील कुटे, कल्याण कुटे, विकास कुटे, सतीश काकडे, तौर महाराज, सरपंच श्रीराम काकडे, उपसरपंच पंजाब काकडे, सरपंच संदीप डावकर, विष्णू निर्मळ, सुधाकर मोरे, बाबा जगताप, सुरेश माने, बद्रीनाथ जटाळ, उपसरपंच अमोल खामकर, सरपंच राजेंद्र राऊत, सरपंच अशोक शिंदे, शामराव मोरे, विठ्ठल काळे, सुरेश काकडे, जालिंदर काकडे, सखाराम शिंदे, नंदकिशोर कदम यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

बीडच्या पुरणदास मठ संस्थानात साकारणार भव्य आशापूरक शिवमंदिर!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जुना मोंढा भागात स्थित असलेल्या पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळाच्या भव्य परिसरात भव्यदिव्य असे आशापूरक शिवमंदिर उभारण्यात येत असून नुकतीच या मंदिराच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले असून कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.बिंदुसरा नदीच्या काठावर पूर्वेस जुना मोंढा भागात पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळाचा भव्य परिसर असून या निसर्गरम्य परिसरात असलेल्या गोशाळेत शहरात मोकाट फिरणार्या मुक्या जनावरांचे आणि गाईंचे संगोपन केले जाते. या

ठिकाणी पुरणदास महाराजांचे मंदिर असून नवसाला पावणार्या रामभक्त हनुमानाचे तसेच नागदेवतेचे मंदिर आहे. या ठिकाणी गोशाळेबरोबरच विविध पक्षी आणि प्राण्यांचे संगोपन केले जाते. तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी विविध साहित्य उपलब्ध आहे. या निसर्गरम्य परिसरात भव्य आशापूरक शिवमंदिर उभारण्याचा संकल्प पुरणदास मठ संस्थानग आणि गोशाळेचे सचिव तथा युवा शक्ती सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष रणजीत पवार यांनी केला होता. त्यांच्या या संकल्पाला पूर्णत्व देण्याचे काम प्रभू गोलक्षदास महाराज यांनी केले आहे. सदरील शिवमंदिरात उज्जैन येथून भव्य महादेवाची पिंड आणि नंदीची मूर्ती मागविण्यात आली आहे. पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळेला पुरणदास महाराज, भगवान बाबा, नागनाथ महाराज, हरिदास महाराज, सिलारामजी महाराज, किसननाथजी महाराज यांचे शुभाशीर्वाद लाभलेले आहेत.या ठिकाणी नव्यानेच उभारण्यात येणार्या आशापूरक शिवमंदिराचे भूमिपूजन प्रभू गोलक्षदास महाराज, पुरणदास महाराज मठ संस्थान आणि गोशाळेचे सचिव रणजीत पवार, दै. मराठवाडा साथीचे बीड जिल्हा प्रतिनिधी संदीप बेदरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी राजाभाऊ चव्हाण, सुधीर चव्हाण, बाबुराव जाधव, बबलू ढाकणे, विजय रायभान, शैलेश गीते, सचिन पवार, डॉ. सिद्धांत बेदरे, अभिषेक पवार, प्रेम कोयरे, अक्षय पवार, बाळू जैन, टिंकू जैन आदींची प्रमुख उपस्थिती होती.

वाळु माफियांची माजलगावच्या उपविभागीय अधिकाऱ्यांच्या गाडीला धडक

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेवराईच्या तिघांविरोधात गुन्हा दाखल

गस्ती दरम्यान उपविभागीय अधिकाऱ्यांसह पथकाला दादागिरी करत जीवे मारण्याची धमकी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावात वाळू माफियांची दादागिरी प्रचंड वाढली आहे.याचा प्रत्यय खुद्द उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या वाट्याला दि २८ नोव्हेंबर गुरुवार रोजी आला.वाळू चोरी रोखण्यासाठी फिरणाऱ्या त्यांच्या गस्तीपथकाच्या वाहनाचा पाठलाग करत वाळू माफियाकडून

वाहनाला धडक दिली.दरम्यान यावेळी वाळू माफियांनी धमकावण्याचा प्रयत्न केला.व जीवे मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल केल्याने गेवराईच्या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव तालुक्यात वाळू माफीयांनी राजरोसपणे गोदाकाठच्या नदीपात्रातील वाळू उपसण्यास सुरुवात केली आहे.कोणत्याही प्रकारचा लिलाव नसतानाही सर्वत्र वाळूचे ढिगारे दिसत आहेत.या विरोधात अनेक दैनिकात बातम्या प्रकाशित झाल्या होत्या.या बातम्यांची दखल घेत माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी गोदाघाटात गस्त सुरू केली.दि.२८ नोव्हेंबर गुरुवार रोजी दुपारी टाकरवण- शेलगावथडी दरम्यान त्यांच्या वाहनाला एक कार पाठलाग करत होती.हे लक्षात येताच त्यांनी आपले वाहन थांबवले व विनापरवाना असणाऱ्या त्या कारलाही थांबवले. यावेळी कारमध्ये असणारे व्यक्तींनी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्यासोबत अरेरावीची भाषा केली.त्यांच्यासोबत हुज्जत घातली. शासकीय कामात अडचण आणली. व त्यांच्या गाडीला डॅश मारून निघून गेले. दरम्यान उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात करण सोमनाथ माटे (रा.गेवराई),संजय रामदास पवार (गेवराई),अनंत खरात (घनसावंगी) विरोधात कलम १२६ (२) १३२,३५२, (२) (३) ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान सदरील घटनेने वाळू माफियांची गुंडगिरी कोणत्या थराला गेली आहे हे दर्शवत आहे.यावर कडक कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

विद्यार्थ्यांची स्वप्ने मोठी असावीत- नवनियुक्त उपजिल्हाधिकारी डॉ. घाटूळे

स्पर्धा परीक्षे विषयी विद्यर्थ्यांना मार्गदर्शन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपले उज्वल भविष्य घडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठ-मोठी स्वप्ने पाहिले पाहिजेत. तसेच त्या स्वप्नपूर्तीसाठी कठीण परिश्रम करणे आवश्यक आहे, असा सल्ला एमपीएसी च्या परीक्षेत राज्यात सर्वप्रथम आलेले नवनियुक्त उपजिल्हाधिकारी डॉ. महेशअरविंद घाटूळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

तालुक्यातील आपेगाव येथील शिक्षण महर्षी कर्मवीर कै. शेषराव आप्पा शिंदे यांच्या सृती समारोह निमित्त विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन करतांना डॉ. महेश घाटूळे बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. घाटूळे म्हणाले की, विद्यार्थ्यांना अभ्यास करीत असतांना वारंवार प्रश्न पडले पाहिजेत. या प्रश्नांचे उत्तरे आपल्या शिक्षकांना विचारणा बरोबरच विविध माध्यमातून त्याच्या शोध घेण्याची चिकित्सक वर्ती त्यांच्याकडे असली पाहिजे. स्वप्न मोठे पाहून चालणार नसून ती सत्यात आणण्यासाठी प्रामाणिकपणे व कठीण परिश्रम करणे आवश्यक आहे असा सल्ला त्यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. इंग्रजी शाळेपेक्षा मराठी शाळेचे शिक्षण दर्जेदार असून आलीकडे इंग्लीश स्कुलचे वाढलेले फ्याड धोकेदायक असल्याचे सांगून प्रशासनातील बरेच अधिकारी मराठी शाळेचे असल्याचे ◀◀ पान २ वर

युथ क्लबकडून रक्तदान शिबिराचे आयोजन

किल्लेधारूर । प्रतिनिधी

दिलासा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.मधुकरभाऊ धस यांच्या आठव्या पुण्यतिथी निमित्त दि.३ डिसेंबर २०२४ रोजी किल्ले धारुर युथ क्लब यांच्या कडून रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

किल्ले धारूर शहरातील तलावाच्या खोलिकरणासाठी विशेष सहकार्य करणारे दुष्काळ जन्य परस्थितत धारूर मधील युथ क्लब च्या सहकार्याने शहरातील तलावातील गाळ काढण्याचे सामजिक कार्य करण्यासाठी दिलासा संस्थेचे संस्थापक मधुकरभाऊ धस यांनी मोलाचे सहकार्य केले होते.त्याचे काही दिवसा नंतर आकस्मित निधन झाले त्याचे सामाजिक कार्य मोठे होते त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्याच्या आठवणीत दर वर्षी युथ क्लब कडून धारूर शहरात रक्त दान शिबिराचे आयोजन केले जाते या वर्षी दि.३ डिसेंबर २०२४ रोजी धारूर बस स्थानकाच्या आवारात शिबिराचे आयोजन केले आहे.या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेण्याचे आवाहन युथ क्लब कडून करण्यात आले आहे.या कार्यक्रमास आगर प्रमुख नवनाथ चौरे, पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे डॉ. असोसिएशनचे अध्यक्ष मयूर सावंत याची विशेष उपस्थिती राहणार आहे.

परळी : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महासचिव मुकुलजी वासनिक यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीत त्यांची अनेक राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा झाली. देशाच्या समोरील आव्हाने, तरुणाईचे भविष्य तसेच सामाजिक व्यवस्थेच्या समोरील आव्हाने यासह अनेक विषयांवर त्यांनी यावेळी चर्चा केली.

तापमानातील बदलामुळे लहान मुले, वृद्ध आजारी पडण्याचे प्रमाण वाढले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांमध्ये अंबाजोगाई शहर आणि परिसरात तपमानात सातत्याने बदल होत असल्याने लहान मुले वृद्ध माणसे आजारी पडू लागली आहेत लहान मुले सर्दी खोकला होतात यामुळे त्रस्त झाली आहेत आजारी पडण्याची त्यांचे प्रमाण हे ३० ते ४० टक्क्यांनी वाढल्याची वैद्यकीय सूत्रांचे म्हणणे आहे तसेच जेष्ठ नागरिकांमध्ये संसर्गजन्य आजाराचे प्रमाण ५०% नी वाढले आहे त्यामुळे रुग्णालयामध्ये रुग्णांच्या संख्येत वरचेवर वाढ होताना दिसत आहे

सकाळी थंडी व दुपारी वाढते तापमान असा वातावरणात बदल होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांना आणि वृद्ध माणसांना होत असल्याचे लक्षात येत आहे लहान मुलांमध्ये सर्दी खोकला ताप याबरोबरच छातीमध्ये घरघर सुका खोकला होत असल्याचे आढळून येत आहे या काही दिवसात लहान मुले व वृद्ध माणसे आजारी पडण्याच्या प्रमाणात वरचेवर वाढ झाल्याचे माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आणि ३० ते ५० वयोगटातील मधुमेह रक्तदाब असलेल्या तरुणांना खूप वृद्धांना बदलत्या वातावरणाचा मोठा त्रास होत आहे

अंबाजोगाईत मोबाईल हिसकावून नेणारी टोळी जेरबंद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात मोटार सायकल वर येवुन पाई जात असलेल्या व्यक्तीचे मोबाईल हिसकावुन नेवुन चोरी करणारी टोळी सक्रिय झाली होती दरम्यान दोन गुन्हयांची नोंद पो.स्टे.अंबाजोगाई शहर ठाण्यामध्ये नोंदविण्यात आली होती. सदर चोरीचे अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण करुन स्थागुशा बीड येथील पोउपनि सुतळे यांना याकामी पाचारण केले. पोउपनि सुतळे यांनी दिनांक २८/

११/२०२४ रोजी अंबाजोगाई शहर आरोपी शोध घेत असतांना गुप्त बातमी मिळाली की, निखील लक्ष्मण घाडगे रा.दौनापुर याचेकडे चोरीचा १० प्लस मोबाईल असुन तो मुकुंदराज सभागृह समोर आहे अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यावरुन स्था.गु.शा.पथकाने तात्काळ रवाना होवुन नमुद ठिकाणावरुन

स्थानिक गुन्हा शाखा बीडची कारवाई

निखील लक्ष्मण घाडगे व त्याचे दोन मित्रांसह मिळुन आला.

निखील यास मोबाईल संदर्भात विचारपुस करता त्याने त्याचे इतर दोन मित्र (अल्पवयीन) यांचेकडुन घेतला असल्याने कळविले. दोन अल्पवयीन इसमांना मोबाईल बद्दल विचारपुस केली असता त्यांचेकडुन अंबाजोगाई शहर २५८/२०२४ कलम ३९२,३४ या गुन्हयातील गेलामाल मिळुन येवुन त्यांची संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांचेजवळ एक आय फोन १६ प्रो कं. मोबाईल मिळुन आला असुन सदर ◀◀ पान २ वर

न्यू व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये आज बाराव्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन खेळाडू तसेच क्रीडा शिक्षक पीराजी कुसळे यांच्या हस्ते करण्यात आले. बाराव्या क्रीडा स्पर्धेची सुरुवात अंबानगरीचे ग्रामदैवत श्री योगेश्वरी देवीच्या मंदिरापासून क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आली. या क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन प्रा डी एच थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, धनराज

सोळंकी, प्रा सविता बनाळे, डॉ अर्चना थोरात यांची देखील उपस्थिती होती. प्रज्वलित करण्यात आलेली ज्योत शाळेच्या विद्यार्थ्यांकडून मोदी लर्निंग सेंटर पर्यंत नेण्यात आली. आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य रेंजो रामचंद्रन यांनी मुलांमध्ये खिलाडू वृत्ती बनली जावी यासाठी संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत भैया मोदी यांचे सर्वतोपरी सहकार्य असते , म्हणूनच आज पर्यंत आर्यन जिरे (कुराश) कल्पेश जाधव (फिन्सिंग) ओम बडे (फिन्सिंग) हर्शवर्धन जगताप (शूटींग) प्रिया कांदे (फिन्सिंग स्टेट) सर्व नॅशनल साठी पात्र झाले असल्याचे सांगितले .

शालेय क्रीडांगणावर या स्पर्धांचे उद्घाटन खेळाडू तथा क्रीडा शिक्षक पीराजी कुसळे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावरून बोलताना कुसळे यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे क्रीडा विषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की कोणत्याही स्पर्धकांकडून खिलाडू वृत्तीने कुठलाही खेळ खेळला जावा. खेळाकडे खेळ म्हणून पाहिले तर त्यातून आपनामध्ये खिलाडूवृत्ती ,शिस्त लागण्यात मदत होते. ◀◀ पान २ वर

बीड : श्री शनि अमावस्या निमित्त श्री क्षेत्र शनि मंदिर येथे भाविक भक्तांची दर्शनासाठी रिघ

रब्बी पिकांच्या पिक स्पर्धेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे-गंडे

अंबड । प्रतिनिधी

कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये मागील वर्षाप्रमाणे तालुका,जिल्हा व राज्य पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.उपरोक्त पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन अंबड तालुका कृषी अधिकारी बी.आर.गंडे यांनी केले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध ◀◀ पान २ वर

आ.सुरेश अण्णा धस यांचा मंत्रिमंडळात समावेश करा - शहाबाज सय्यद

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा विधानसभा मतदारसंघाचे अभ्यासु, विकासाची जाण असलेले सर्वसामान्यांचे नेतृत्व सुरेश अण्णा यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी युवा नेत्रत्व शहाबाज सय्यद यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

आष्टी पाटोदा शिरुर विधानसभा मतदारसंघातील



मतदारांनी आ.सुरेश अण्णा यांना विधानसभेत निवडून पाठवले असून त्यांना आष्टी पाटोदा शिरुर मतदार संघाच्या विकासाची जाण आहे तसेच बीड जिल्ह्यात विकासात्मक कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता म्हणून सुरेश अण्णा यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची

संधी पक्षश्रेष्ठीने देणे गरजेचे आहे. आण्णा या मतदारसंघात विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज आह आज या भागातील ◀◀ पान २ वर

सद्गुरु बाबा व डोंगराच्या पायथ्याला मल्लांनी गाजवला कुस्त्यांचा फड

कासारी येथे यात्रेनिमित्त भाविकांची प्रचंड गर्दी; ९६ किलो वजनाच्या कुस्त्यांनी रंगवला फड

दिंद्रुड । प्रतिनिधी

परिसरातील कासारी येथे जागृत देवस्थान म्हणून प्रख्यात असलेल्या श्री. सद्गुरु बाबांच्या परंपरागत यात्रेत बुधवार ते शुक्रवार या तीन दिवसांच्या यात्रेत हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. डोंगरावर समाधी असलेले सद्गुरु बाबा व डोंगराच्या पायथ्याशी महाराष्ट्रातील मल्लांनी फड गाजवला. काल गुरुवारी

(दि.२८) कुस्त्यांच्या भव्य दंगली चे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते.

श्री. सद्गुरु बाबा देवस्थान व डोंगराच्या पायथ्याला वसलेल्या कासारी (ता.धारुर) गावात सद्गुरु बाबांची यात्रा वर्षानुवर्षांपासून परंपरागत प्रत्येक वर्षी भरते. जवळपास दीडशे वर्षांची समाधी असलेल्या या यात्रेत सर्व जाती-धर्माचे भाविकभक्त सहभागी होतात.प्रतिवर्षी गावातील प्रत्येक घरातून गाव वर्गणी जमा करून ही यात्रा भरवली जाते. कासारी हा बालाघाट डोंगरातील दुर्गम परिसर असून, निसर्गाच्या सानिध्यात मोठ्या उत्साहात यात्रेला ◀◀ पान २ वर

निसटत्या पराभवाचा दिलदारपणे स्वीकार करून पृथ्वीराज साठे यांनी मतदारसंघात सुरू केला आभार दौरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात नुकत्याच विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका संपन्न झाल्या. निवडणुकीसाठी उभे असलेल्या काही उमेदवारांना जय ते काहींना पराजय स्वीकारावा लागला. विधानसभेच्या निकालानंतर शरदचंद्र पवार यांनी सर्व पराभूत उमेदवारांची बैठक बोलावून त्यांना पराभवाने खचुन न जाता पुन्हा जोमाने जनतेत मिसळून त्यांची कामे करण्यासाठी प्रेरित केले. शरद पवारांचा या वयातील देखील उत्साह व ऊर्जा पाहून बैठकीत

आभार दौऱ्यात अनेक ठिकाणी मतदार होत आहेत भावूक

उपस्थित सर्व उमेदवारांना नवीन स्फूर्ती मिळाल्याचे जाणवले.

झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान केज विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांचा केवळ २६०० मतांनी निसटता पराभव झाला. मात्र झालेल्या पराभवाने खचून न जाता त्यांनी त्या पराभवाचा ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

राजभवनाऐवजी अमावस्येला पूजा-अर्चा करण्यासाठी शेतात गेले; पुण्यातून ठाकरेंचा टोला, आढाव यांचं उपोषण सुटलं

पुणे । प्रतिनिधी

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेलं समाजसेवक बाबा आढाव यांचं उपोषण आज अखेर मागे घेण्यात आलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट घेऊन बाबा आढाव यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. त्यानंतर, शिवसेना युबीटी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, व शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या जयंत पाटील यांनीही त्यांची भेट घेतली. यावेळी, सर्वांनी उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार, बाबा आढाव ( ) यांनी आपलं उपोषण सोडलं, पण त्यांचं आंदोलन सुरूच राहणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पुण्यातील फुले वाडा येथे सुरू असलेल्या आंदोलनास उद्धव ठाकरेंनी भेट देऊन राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावरुन महायुती व केंद्रातील मोदी सरकारला लक्ष्य केलं. तसेच, ईव्हीएमविरुद्ध आणि लोकशाही वाचविण्यासाठी आता मोठं आंदोलन

उभारलं जाईल, असेही ठाकरेंनी म्हटले. यावेळी, नाव न घेता एकनाथ शिंदेंवरही निशाणा साधला.

आजचा दिवस लक्षात राहणारा आहे, बाबा आढाव प्रेरणा देणारे असून प्रेरणा कधी म्हातारी होऊ शकत नाही. हरलेल्यांना आणि जिंकलेल्यांना देखील या निकालावर विश्वास नाही. वणवा पेटवायला एक ठिणगी पुरेशी असते, बाबा आढाव यांचं हे आंदोलन म्हणजे ती ठिणगी आहे. योजनांच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्र विकत घेतला. या घोळात एक मोठा विषय ईव्हीएमचा आहे. माझे मत कोठे जाते हे समजायला हवे, शेवटच्या एका तासात ७६ लाख मतं का वाढली, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी येथील आंदोलनातू विचारला. तसेच, एवढं राक्षसी बहुमत असून देखील महाराष्ट्रात आनंद का नाही. बहुमत मिळून देखील राजभवनात जाण्याऐवजी हे लोक शेतात पूजा-अर्चा करण्यासाठी का जात आहेत. अमावस्येला पूजा अर्चा करण्यासाठी गेले, यावरुन त्यांची मानसिकता दिसून येते, असे म्हणत नाव न घेता काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोलाही लगावला.

महाराष्ट्र लेचा पेचा नाही, आपला महाराष्ट्र देशाला दिशा देईल. महाविकास आघाडीतील शिवसेना , काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे आंदोलन पुढे नेतील. बाबा आढाव यांनी हे आंदोलन मागे घ्यावे, महाराष्ट्रात अशी आंदोलने सर्व ठिकाणी होतील, असेही ठाकरेंनी यावेळी म्हटलं. तर, हा स्वातंत्र्याचा दुसरा लढा आहे, इथे अदानीला येऊ देऊ नका, असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी अदानींवर निशाणा साधला.

वारकरी संप्रदाय मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुका वारकरी संप्रदाय मंडळाच्या दिनदर्शिकेचे हभप स्वामी निरंजनानंद सरस्वती (परमहंस) व हभप वैराग्यमुर्ती शंकर महाराज मराठे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. दरवर्षी प्रमाणे कार्तिकी वारीनिमित्त वारकरी दिंड्यांचे जांभूळ फाटा येथे स्वागत करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदाय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. मंडळाने छापलेल्या पाच हजार दिनदर्शिकांचे संपूर्ण तालुक्यात मोफत वितरण केले जाणार आहे.

कार्यक्रमासाठी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हभप नंदकुमार महाराज भसे यांसह हभप नितीन घोटकुले, माजी सभापती सुवर्णा कुंभार, माजी सरपंच संतोष जांभूळकर, माजी उपसरपंच एकनाथ शेटे, मंडळाचे मार्गदर्शक शिवाजी पवार, मंडळाचे कार्याध्यक्ष संतोष कुंभार आदींसह वारकरी व मंडळाचे सर्व पदाधिकारी

मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा, आळंदी कार्तिकी पायी वारी निमित्त कोकण विभाग व मावळ तालुक्यामधून आळंदीला पायी जाणाऱ्या दिंड्यांतील वारकऱ्यांना मावळ तालुका वारकरी संप्रदाय मंडळाच्या वतीने याहीवर्षी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच दिंड्यांना शाल श्रीफळ देवून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे शुक्रवार (दि.२२) ते रविवार (दि.२४) रोजी श्री संतकृपा व्यापारी संकुल येथे आयोजन करण्यात आले होते. राजस्थान वारकरी सांप्रदायाचे प्रदेशाध्यक्ष हभप श्रीमंत रमेशसिंहजी व्यास, हभप स्वामी निरंजनानंद सरस्वती (परमहंस), हभप वैराग्यमुर्ती शंकर महाराज मराठे यांच्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी तालुक्यातील अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाला सदिच्छा भेट देवून उपक्रमाचे स्वागत केले. तसेच दिंड्यांतील अनेक वारकरी बंधू-भगिनींनी मंडळाच्या कार्याप्रती समाधान व्यक्त केले.

कर थकवलेल्या आणखी ४२ मिळकतींचा लिलाव

पुणे । प्रतिनिधी

मिळकतकराची थकबाकी रखडल्याने पालिकेकडून जप्त करण्यात आलेल्या आणखी ४२ मिळकतींचा लिलाव केला जाणार आहे. या मिळकतींची थकबाकी सुमारे ११ कोटी ११ लाख रु. आहे. या लिलावात असलेल्या मिळकतींचे बाजारमूल्य सुमारे ५८ कोटी रुपयांचे असल्याची माहिती प्रशासनाने दिली. हा लिलाव १० डिसेंबर रोजी ऑनलाइन पद्धतीने केला जाणार आहे.

महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी १० हजार कोटींवर गेली आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांत मिळकती सील करण्यासह त्या जप्त केल्या जात आहेत. यात दरवर्षी १,८०० ते २,००० मिळकती जप्त केल्या जात आहेत. त्यात प्रामुख्याने व्यावसायिक मिळकतींचा समावेश आहे. कर भरण्यासाठी महापालिकेकडून वारंवार नोटीस बजावूनहीही काही प्रतिसाद मिळत नाही. तसेच या मिळकतींबाबत न्यायालयात कोणताही दावा अथवा वाद नसल्याने अशा जप्त केलेल्या मिळकतींचा लिलाव करण्याची प्रक्रिया महापालिकेने मागील वर्षीपासून सुरू केली आहे. मागील वर्षीही महापालिकेने सुमारे ५६ मिळकती लिलावात काढल्या. मात्र, त्यातील केवळ दोनच मिळकतींचा लिलाव झाला असून महापालिकेस अवघा ४ कोटींची थकबाकी वसूल करता आलेली आहे. त्यानंतर या वर्षी पुन्हा प्रशासनाने आणखी ४२ मिळकतींचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे.

कात्रज चौकातील वाहतुकीत मंगळवारपासून बदल

कात्रज । प्रतिनिधी

कात्रज चौकातील वाहतुकीत उड्डाणपुलाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले आहेत. उड्डाणपुलाच्या मुख्य चौकातील दोन पिलरवर पूल (सेगमेंटल लॉचिंग) टाकण्याचे काम सुरु होणार असल्याने वाहतूक वळविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त अमोल झेंडे यांनी पत्र काढले आहे. हा बदल मंगळवारपासून (ता. ३ डिसेंबर) प्रायोगिक तत्त्वावर पुढील आदेश येईपर्यंत लागू राहणार आहे.

संबंधित आदेशान्वये कात्रज चौकात जड/अवजड वाहनांना (डंपर, हायवा, मिक्सर, हेवी मोटर व्हेईकल्स, हेवी गुड्स मोटार व्हेईकल्स, हेवी ट्रान्स्पोर्ट व्हेईकल, ट्रेलर्स, कंटेनर्स, मल्टी ॲक्सल वाहने) बंदी असणार आहे. तसेच, साताऱ्याकडून जुन्या कात्रज बोगद्यामार्गे येणाऱ्या वाहनांना शिंदेवाडी

पुलापासून आणि नविन बोगद्यामार्गे कात्रज चौकाकडे येणाऱ्या वाहनांना नवले पूल येथे आणि मुंबईकडून वारजेमार्गे कात्रज चौकाकडे येणाऱ्या वाहनांना नवलेपूल येथे प्रवेश बंद राहणार आहे.

तसेच, सोलापूरकडून हडपसर-मंतरवाडीमार्गे कात्रज चौकाकडे येणाऱ्या वाहनांना मंतरवाडी चौकाच्या पुढे, सासवडकडून मंतरवाडीमार्गे कात्रज चौकाकडे येणाऱ्या वाहनांना मंतरवाडी चौकाच्या पुढे, बोपदेव घाटाकडून कात्रज चौकाकडे येणाऱ्या वाहनांना खडीमशिन चौकापुढे, मार्केटयार्ड, गंगाधाम बिबवेवाडीमार्गे कात्रज चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना इस्कॉन मंदिर चौकाच्या पुढे प्रवेश बंद राहील. सातारा रस्त्यावरून स्वारगेटकडून कात्रजमार्गे साताऱ्याकडे जाणाऱ्या वाहनांनाही प्रवेश बंद राहील. त्याचबरोबर मंतरवाडी, उंड्री, पिसोळी भागातील स्थानिक जड वाहनांना रात्री १० वाजल्यापासून सकाळी ४ वाजेपर्यंत प्रवेश सुरू ठेवण्यात येणार आहे. मात्र, त्यांना इस्कॉन मंदिर चौकाच्या पुढे कात्रज चौकाकडे प्रवेश बंद राहील.

एसटी, ट्रॅव्हल्ससाठी नियम

मुंबईकडून वारजेमार्गे कात्रज चौकाकडे येणाऱ्या एसटी बसेस व ट्रॅव्हल्सला नवले पूल येथून प्रवेश बंद राहील. तर, साताऱ्याकडून स्वारगेटकडे येणाऱ्या एसटी बसेस व ट्रॅव्हल्सला नवले पुलाखालून उजवीकडे वळण घेऊन कात्रज येथून स्वारगेटकडे जावे लागणार आहे. संबंधित आदेश हे जड/अवजड वाहनांसाठी असून स्थानिक दुचाकीचालकांसाठी आणि चारचाकी वाहनांसाठी रस्ता खुला राहणार आहे. परंतु, नागरिकांनी सहकार्याच्या भावनेतून जेवढे शक्य असेल तेवढे पुढील काही काळ कात्रज चौकातील प्रवास टाळून पर्यायी मार्गाचा वापर करावा.

सिग्नल तोडणारे पीएमपी बसचालकही कचाट्यात; हजार ते बाराशे रुपये दंड

पुणे । प्रतिनिधी

सिग्नल तोडल्याची तक्रार आल्यास संबंधित बस चालकाला हजार ते बाराशे रुपये दंड पीएमपी प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मागील महिन्यात दोन चालकांना हा दंड करण्यात आला आहे. बस चालकांना वाहतुकीची शिस्त लागावी, यासाठी प्रशासनाने कडक पावले उचल्याचे सांगितले.

पुण्याची वाहतूक दिवसेंदिवस वाढत असून, बेशिस्त वाहनचालकांमुळे शहरातील रस्त्यांवर कोंडी होत आहे. हे टाळण्यासाठी ठिकठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली. मात्र, तरीही दुचाकी-चारचाकी वाहनांसह अन्य वाहने सिग्नल तोडतात. एवढेच काय तर सार्वजनिक वाहतूक असलेल्या पीएमपी बसचे काही चालकही सिग्नल तोडतात. अशावेळी चुकून एखादा अपघात झाल्यावर एखाद्याच्या जीवावर बेतू शकते. तसेच बसमधील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होतो.

त्यामुळे पीएमपी प्रशासनाने अशी दंड वसुली सुरू केली आहे. त्यानुसार दर महिन्यात तीन ते पाच चालकांवर कारवाई होतेच. आता वाहतूक पोलिसांकडूनही अशी कारवाई सुरू करण्यात आली आहे. अशा बेशिस्त बसचालकांच्या वेतनातून हे पैसे कापून घेतले जात आहेत.

तरुणाच्या आत्महत्ये प्रकरणी दोघांवर गुन्हा

चाकण, : प्रेयसी व योग शिक्षकाने बलात्काराच्या खोट्या खटल्यामध्ये अडकविण्याची धमकी दिल्याने चाकणमधील एका तरुणाने लोणावळ्यातील दरीत उडी मारुन आत्महत्या केली होती. याप्रकरणी चाकण पोलिसांनी तरुणाची प्रेयसी व एका योग शिक्षकावर गुन्हा दाखल केला आहे.

सूर्यकांत रामदयाल प्रजापती (वय २७, रा. श्रीरामनगर, चाकण) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याचा भाऊ श्रीकांत रामदयाल प्रजापती (वय २५, रा. श्रीरामनगर, चाकण) यांनी चाकण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी योग शिक्षक बापू सोनवणे (रा. चाकण) व प्रेयसीवर गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती चाकण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सूर्यकांत याने मागील महिन्यात लोणावळ्यात आत्महत्या केली होती. त्याची प्रेयसी व योग शिक्षकाने त्याला बलात्काराच्या खोट्या केसमध्ये अडकविण्याची धमकी दिली होती. टेलिग्राम ॲप, व्हाट्सॲप व गुगल पेवर घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करून अपमान केला. या त्रासाला कंटाळून त्याने चाकण येथून घर सोडले होते. नातेवाईक त्याचा शोध घेत होते. त्यानंतर १६ ऑक्टोबर रोजी त्याने व्हिडिओ काढून आपल्या नातेवाइकांना पाठविला होता व दरीत उडी मारून आत्महत्या केली होती. दरम्यान, या व्हिडिओमध्ये दिसत असलेल्या पार्श्वभूमीवरून सूर्यकांत याच्या आत्महत्येचा शोध लागला. लोणावळा येथील शिवदुर्गच्या पथकाने राजमाची दरीत ३७० फूट खोल दरीत शोध घेऊन त्याचा मृतदेह बाहेर काढला होता. त्यानंतर आता त्याच्या भावाने फिर्याद दिल्यानंतर चाकण पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

बोगस बंगाली डॉक्टरला न्यायालयाचा दणका; सुनावणीत दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

पुणे । प्रतिनिधी

वैद्यकीय पदवी अथवा पदविका नसताना प्रॅक्टीस करणाऱ्या बोगस डॉक्टरला न्यायालयाने दणका दिला आहे. २ वर्षे सक्तमजुरी आणि २ हजार रुपये दंडाची शिक्षा खडकी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एल.व्ही.श्रीखंडे यांनी सुनावली. आरोपी मुळचा पश्चिम बंगाल येथील आहे. दंड न भरल्यास त्याला १५ दिवस अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

मिलनकुमार अमर ठाकुर (वय ३४, रा. धानोरी, मूळ. पश्चिम बंगाल) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत २० ऑगस्ट २०१४ रोजी विश्रांतवाडी पोलिसात गुन्हा दाखल झाला होता. महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. रेखा उमेश गलांडे ऊर्फ डॉ. रेखा लबडे यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता सायली ठोकळ यांनी काम पाहिले. त्यांनी परिश्रम घेत डे डू डे युक्तीवाद केला.

सहाय्यक पोलीस फौजदार पाटील यांनी तपास केला. त्यांना न्यायालयीन कामकाजासाठी हवालदार कोळप आणि शिपाई घोडेकर यांनी मदत केली. मोहिमेतंगर्त फिर्यादी बोगस डॉक्टरचा शोध घेत होत्या. त्यावेळी ठाकुरकडे ॲलोपॅथीची कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना औषधांचा साठा आढळून आला. बीईएमएस व्यावसायिकांना डॉक्टर उपाधी लावण्याचा अधिकार नसताना, त्याच्याकडे लेटर पॅड व डॉक्टर उपाधीचा शिक्का आढळून आला. त्याद्वारे तो व्यवसाय करत असल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले होते. या प्रकरणी पोलिसंनी तपास करून दोषारोपपत्र दाखल केले. त्यावर सुनावणी करत न्यायालयाने शिक्षा सुनावली.

पुण्यात रविवारी 'हार्टफुलनेस रन'चे आयोजन

शारीरिक व मानसिक आरोग्यासह पर्यावरणासाठी अभिनव उपक्रम

पुणे । प्रतिनिधी

ग्रॅन्यूल्स ग्रीन हार्टफुलनेस रन या जागतिक उपक्रमाचे आयोजन १ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजता पुण्यात होणार आहे. वाघोली येथील एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल येथे सुरू होणारी आणि नगर रोडवरून परत येणारी ही स्पर्धा हार्टफुलनेस संस्थेने श्री.कमलेश डी. पटेल (दाजी) यांच्या मार्गदर्शनाखाली युवा व क्रीडा मंत्रालय व फिट इंडिया मूव्हमेंट यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. देशभरात ८० ठिकाणी होणारी ही मॅरेथॉनमध्ये जवळपास ४०,०००+ लोक एकत्र येणार आहेत. या मॅरेथॉनचा उद्देश शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य वाढवणे तसेच पर्यावरणीय शाश्वतता

टिकवणे हा आहे.

या रनमध्ये सहभागी होणाऱ्यांना १ किमी, ३ किमी, ५ किमी, व १० किमी या श्रेणीमध्ये सहभागी होण्याचा पर्याय देण्यात आला आहे. तसेच, या उपक्रमातून जमा होणाऱ्या निधीचा उपयोग १०,००० झाडे लावण्यासाठी करण्यात येईल. या मॅरेथॉनला डॉ. जगन्नाथ दीक्षित, डायबेटीस रिव्हर्सल तज्ज्ञ आणि प्रीती मस्के, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड धारक, यांच्या प्रमुख उपस्थितीत हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे.

एमआयटी-एडीटी युनिव्हर्सिटी, अदार पूनावाला ग्रुप, जी.एच. रायसोनी कॉलेज, ॲडव्हेंचर आयआयटी, गिरिराज ज्वेलर्स आणि आयव्ही इस्टेट या नामांकित संस्थांनी या अभिनव उपक्रमाला पाठिंबा दर्शविला आहे. या उपक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेसाठी एसएनबीपी स्कूलच्या प्राचार्या श्वेता



वकील, हार्टफुलनेसचे प्रवक्ते विक्रम मकवाना, प्रतिनिधी सुरभी सहाई, युवा प्रतिनिधी प्रशांत पाटील, एडव्हेंचर आयआयटीचे प्रभज्योत सिंग, गौतम बिरहाडे, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी प्रा.चंद्रकांत बोरुडे आदी उपस्थित होते. मकवाना म्हणाले, ''या धावण्याच्या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, मग धावणे असो, जॉगिंग असो किंवा चालणे, हे शाश्वतता आणि सामुदायिक आरोग्यासाठी आहे. हार्टफुलनेसने २०२० पासून २० लाखांहून अधिक झाडे लावली आहेत आणि ८० हून अधिक दुर्मिळ प्रजातींचे संवर्धन केले आहे. या उपक्रमामुळे १,०२७ एकर जमीन पुनर्जीवित झाली आहे आणि २५,००० टन कार्बन उत्सर्जनाचे समतोल राखण्यात यश आले आहे. सुरभी सहाई म्हणाल्या, १६० देशांमध्ये सक्रिय असलेल्या हार्टफुलनेसकडून व्यक्ती, शाळा आणि कॉर्पोरेशनसाठी मोफत ध्यान आणि इतर आरोग्य कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे या हरित आणि आरोग्यदायी उपक्रमाचा भाग बनण्यासाठी . येथे त्वरित नोंदणी करा,'' असे आवाहनही त्यांनी केले. प्रा. बोरुडे म्हणाले की, ''प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या सशक्त होण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्या दृष्टिकोनाला पूरक उपक्रम म्हणून डॉ. मंगेश कराड यांनी या हार्टफुलनेस मिशनला पाठिंबा दिला आहे.''

> आजकाल आपण बहुतेक जण छोट्या कुटुंबांमध्ये राहतो त्यामुळे आपल्याला आधाराची गरज आहे. ही एकत्र उभे राहण्याची, इतरांसाठी विचार करण्याची, आणि दयाळू व करुणामय समाज तयार करण्याची वेळ आहे. आपल्याला चांगुलपणा आणि एकतेचा प्रसार करायचा आहे. प्रत्येक कुटूंबातील व्यक्तीला आधार व मदत देण्यासाठी हार्टफुलनेस समर्पित आहे.
>
> – श्री.कमलेश डी. पटेल (दाजी),
> संस्थापक, हार्टफुलनेस इन्स्टिट्यूट

भिगवण येथे पशुपालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

भिगवण । प्रतिनिधी

''आधुनिक काळामध्ये कोणत्याही व्यवसायांमध्ये धोका कमी करावयाचा असेल तर एका व्यवसायांवर अवलंबून राहून चालणार नाही. शेती सुद्धा व्यवसाय म्हणून करण्याची आवश्यकता आहे व त्यामध्ये धोके कमी करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने जोडधंदा केलाच पाहिजे. दुग्ध व्यवसाय हा शेतीसाठी सर्वात पूरक जोडधंदा आहे. शेतकऱ्यांनी शेती आणि त्याला जोडून दुग्ध व्यवसाय केल्यास निश्चित प्रगती साधता येईल,'' असे मत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित नलगे यांनी व्यक्त केले.

येथील बँक ऑफ महाराष्ट्र ग्रामीण विकास केंद्रामध्ये भिगवण व परिसरातील शेतकरी व पशुपालकांसाठी एक दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रभारी अधिकारी उमेश निकम, कृषी सहाय्यक देवा फलफले उपस्थित होते. यावेळी डॉ. अभिजित नलगे यांनी पशुपालन व्यवसाय, चारा व्यवस्थापन, मुरघास तयार करण्याची प्रक्रिया व साठवणूक आदींविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना ग्रामीण विकास केंद्राचे प्रभारी अधिकारी उमेश निकम म्हणाले, महाराष्ट्र बँक ग्रामीण विकास केंद्र खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा मित्र म्हणून पुढे येत आहे. शेतीमध्ये आवश्यक आधुनिक तंत्रज्ञानाची तसेच शेती पूरक व्यवसायाची माहिती केंद्रामार्फत शेतकऱ्यांना करून देण्यात येते. पात्र शेतकऱ्यांना कर्ज पुरवठाही बँकेमार्फत करण्यात येतो, त्याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. कृषी सहाय्यक देवा फलफले यांनी प्रास्ताविक व संयोजन केले तर पी. व्ही. लकडे यांनी आभार मानले. दरम्यान मान्यवरांच्या हस्ते पशुपालक शेतकऱ्यांना मुरघास बॅगांचे वाटप करण्यात आले.